www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



Lokhandwala joggers park: HC asks ...

पान ५ वर

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



जास्त पाणी पिणे धोकादायक

पान ४ वर

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ • वर्ष - ०२, • अंक ०९ • पृष्ठे- ०६ • ठाणे, शनिवार, ११ मे २०२४ • RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 • रु.२/-

## ‘ऑपरेशन मंडे होल्ड’ अंतर्गत १२२ संशयीत कंटेनरची सीआययूकडून तपासणी करण्यात येणार

### प्रतिबंधीत चीनी फटाके व इतर वस्तूंचा संशय

● मुंबई, यश सावंत :

जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊसच्या केंद्रीय गुप्तवार्ता विभागाने (सीआययू) आयात करण्यात आलेले सुमारे १२२ कंटेनर ताब्यात घेऊन तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. चीनवरून आलेल्या या बहुतांश कंटेनरमध्ये बंदी घातलेले चिनी फटाके, महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, मायक्रो चिप्स आणि इतर अनेक प्रतिबंधित वस्तू असल्याच्या संशय आहे. कागदोपत्री खोटी माहिती देऊन हे कंटेनर पाठवण्यात आले आहेत. सीसी टीव्हीच्या देखरेखीमध्ये कंटेनर ठेवण्याचे आदेश सीआययूकडून देण्यात आले आहेत.

‘मंडे होल्ड’ असे नाव असलेल्या या ऑपरेशनमध्ये कंटेनर फ्रेट स्टेशन्स (सीएफएस) आणि पोर्ट टर्मिनल्सच्या




सर्व व्यवस्थापकांशी संबंधित कंटेनरमधील वस्तूंच्या पावत्या, त्यांचे मूल्यांकन असलेली कागदपत्रे, परीक्षण करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व १२२ कंटेनर एकाच जहाजातून जेएनपीटी बंदरात आले आणि सध्या जेएनपीटी बंदरातील वेगवेगळ्या कंटेनर फ्रेट स्टेशन्स (सीएफएस) आणि पोर्ट टर्मिनल्सवर आहेत. यातील बहुतांश कंटेनर चीनमधून आल्याचे सूत्रांनी सांगितले.

सीआययूने या कंटेनर्सची तपासणी आणि स्कॅनिंग करून प्रतिबंधित चिनी फटाके आणि इतर प्रतिबंधित वस्तूंचा शोध सुरू केला आहे. गुप्तपणे ही कारवाई सुरू असून त्याची माहिती केंद्रीय यंत्रणांच्या ठरावीक अधिकाऱ्यांनाच आहे. कंटेनरची संख्या मोठी असल्यामुळे त्यांच्या तपासणीला बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. सीआययूकडून प्राप्त पत्रात नमूद करण्यात आलेल्या सर्व कंटेनरवर खूणा करून ते एकाबाजूला ठेवण्याचे काम सुरू आहे.

पान २ वर

## थोडक्यात



### भारत-मालदीव संबंधांचा विकास परस्पर हितसंबंध, संवेदनशीलतेवर आधारित; परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचे प्रतिपादन

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

भारत आणि मालदीव या दोन्ही देशांमधील संबंधांचा विकास ‘परस्पर हित’ आणि परस्पर संवेदनशीलतेवर आधारित आहे, असे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी त्यांचे मालदीवचे समकक्ष मुसा जमीर यांच्याशी केलेल्या संभाषणात सांगितले.

पान २ वर

## हिरानंदानी परीसरात मतदार जोडो पदयात्रेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



● ठाणे, रोहित जैसवाल :

लोकशाही बळकटीकरणामध्ये मतदारांचा सक्रिय सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यास अनुसरून या लोकसभा निवडणुकीत प्रत्येक मतदाराने मतदान करावे यासाठी ठाणे शहरातील हिरानंदानी इस्टेट परिसरात मतदार जोडो पदयात्राचे आज आयोजन करण्यात आले. त्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पदयात्रेत सहभाग घेतला. या ठाणे लोकसभा मतदारसंघातील ठाणे विधानसभेच्या कार्यक्षेत्रात आज ही पदयात्रा मतदार जनजागृतीसाठी काढण्यात आली. या पदयात्रेत मोठ्या उत्साहात मॅस्कॉट या मनोरंजक कार्टून पात्राला सोबत घेऊन मतदान करा,मतदान करा लोकशाहीचा विजय करा आणि २० मे को सब काम छोडो मतदान करो या घोषणा मोठ्या आवाजात घोषणा देण्यात आल्या आहेत.

पान २ वर

## मतदार यादीबाबत व्हॉट्सअॅपद्वारे चुकीचा संदेश व्हायरल केल्याने हडपसरमध्ये एकावर कारवाई

● पुणे, विशाल पाटील :

मतदार यादीत नाव नसल्यास नमुना क्र. १७ चा अर्ज भरून आणि आपले मतदार ओळखपत्र दाखवून मतदान करता येणार असल्याचा दिशाभूल करणारा संदेश व्हॉट्सअॅपद्वारे पसरविल्याने जिल्हा प्रशासनाने एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या संदेशामुळे हडपसर येथील मतदार नोंदणी कार्यालयात नागरिकांनी चौकशीसाठी गर्दी झाली होती. अशा दिशाभूल करणाऱ्या संदेशापासून सावध राहावे, अफवांवर विश्वास ठेऊ नये तसेच असे संदेश पुढे पाठवू नयेत, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार नोंदणीबाबत विशेष संक्षिप्त मोहिमेंतर्गत मतदार नोंदणी, वगळणी व दुरुस्तीबाबत सर्व विधानसभा मतदार संघात गेली वर्षभर काम करण्यात आले असून त्यानुसार मतदार याद्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत.



■ मतदाराचे नाव वगळताना नियमानुसार सर्व कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यामुळे व्हॉट्सअॅप संदेशाद्वारे प्रसारित केलेली माहिती अत्यंत चुकीची आहे, असे स्पष्ट करुन संबंधित व्यक्तीला याबाबत २४ तासांत खुलासा सादर करण्याचे आदेश संबंधित व्यक्तीला जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आले आहेत. खुलासा प्राप्त न झाल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

मतदार यादीत नाव नसेल संबंधितास मतदान करता येणार नाही. मतदार यादीत नाव असल्यास मतदार ओळखपत्र किंवा भारत निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या १२ पुराव्यापैकी एक दाखवून मतदान करता येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. असे चुकीचे संदेश पाठविणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येईल असा इशाराही देण्यात आली आहे.

## वय ३६, चोऱ्या केल्या ६५

### चोरास माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली अटक

● विरार, दिगंबर जाधव :

वसई विरारसह मुंबई आणि ठाणे परिसरात चोऱ्या करणाऱ्या एका अवलिया चोरास माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. या चोराने तब्बल ६५ घरफोड्या केल्याचे उघडकीस आले आहे. गेल्या काही दिवसांपासून वसई विरार शहरात घरफोड्यांचे प्रमाण वाढले होते. वसईच्या शास्त्रीनगर येथील एका घरफोडीचा तपास माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक करत होते.

या वेळी सीसीटीव्ही तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माग काढत आतिश साखरकर (३६) याला अटक केली आहे.



त्याच्याकडून घरफोडीमधील १२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मागील काही वर्षांपासून तो चोऱ्या करत आहे. त्याने यापूर्वी ५७ चोऱ्या केल्या होत्या तर त्याच्या अटकेनंतर वसईतील माणिकपूर, मुंबईतील एमएचबी, विलेपार्ले, जुहू आणि गुजरात मधील उमरगाव पोलीस ठाण्यातील ५ चोऱ्या उघडकीस आल्या आहेत. आतापर्यंत त्याचे एकूण ६५ चोऱ्या केल्याचे उघडकीस आल्याची माहिती पोलीस उपायुक्त (परिमंडळ २) पूर्णिमा चौगुले यांनी सांगितले.

पान २ वर

### मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आणि दुकानाची जाहिरात होण्यासाठी पनवेलमधील व्यापाऱ्याची अनोखी शक्कल




● पनवेल, भावना जैन

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आणि दुकानाची जाहिरात होण्यासाठी पनवेलमधील एका साडी विक्रेत्या व्यापाऱ्याने अनोखी शक्कल लढविली आहे. १३ मे रोजी मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल विधानसभा क्षेत्रात मतदान होणार आहे. मतदान करुन पनवेल शहरताली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याशेजारी दुकानात मतदान करुन थेट दुकानात येणाऱ्या पहिल्या ५१ स्त्रियांसाठी ही योजना दुकानदाराने जाहीर केली आहे. महिला मतदारांसह १३ मे रोजी मतदान करुन येणाऱ्या पहिल्या ५१ पुरुष मतदारांसाठी या दुकानदाराने सियाराम कंपनीचे शर्ट व पॅन्टपीस देणार असल्याची जाहीर केले आहे.

शहरातील द्वारकादास शामकुमार या दुकानाचे चालक शरद पाटील यांनी ही जाहीरात समाजमाध्यमांवर ही जाहिरात केली आहे. याबाबत दुकानचालक शरद पाटील यांना विचारले असता त्यांनी मतदानाचा टक्का वाढावा यासाठी ही योजना सामान्य मतदारांसाठी जाहिर केली असल्याचे सांगितले. मतदान करुन थेट मतदारांना या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी १३ मे रोजी (सोमवारी) दुकान सकाळी सात वाजल्यापासून सुरु ठेवले असून महिला व पुरुष मतदारांसाठी खास कुपनची सोय केल्याचे दुकानचालक पाटील यांनी सांगितले.

## लाच प्रकरणानंतर पुरातत्व विभागाचा कारभार चर्चेत

● नाशिक, सचिन कदम :

पुरातत्व विभागाच्या नाशिक विभाग सहायक संचालक आरती आळे आणि पुरातत्व संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे यांच्याविरोधात दीड लाख रुपयांच्या लाचप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केल्यानंतर पुरातत्व विभागाचा वादग्रस्त कारभारही चर्चेत आला आहे. शहरातील कित्येक वर्षांपासून सुरु असलेले सुंदर नारायण मंदिर दुरुस्तीचे काम, जिल्ह्यातील हेमाडपंथी मंदिर, देवस्थान आदींविषयी पुरातत्व विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



पुरातत्व विभागाच्या वतीने सहा वर्षांहून अधिक काळापासून रविवार कारंजाजवळील सुंदर नारायण मंदिराच्या पुनर्बांधणीचे काम सुरू आहे. करोनामुळे दोन वर्ष कामाला स्थगिती देण्यात आली होती. हे काम संशयास्पद राहिले आहे. स्थानिकांनी याविषयी तक्रारी केल्या आहेत. मंदिराचा कळस उतरवित असताना मंदिरावरील सुंदर नक्षीकाम असलेले दगड, दिशादर्शक दगड गायब आहेत. त्या सुंदर दगड, मूर्तींची विक्री झाल्याची चर्चा आहे. याबाबत स्थानिक संबंधित विभागाशी संपर्क केला असता यातील काही दगड पांडवलेणीमध्ये असल्याचे सांगितले. परंतु, त्या ठिकाणी नक्षीकाम असलेले दगड गायब आहेत.

जिल्ह्यातील जुन्या हेमाडपंथी मंदिराच्या पुनर्बांधणीचे काम सुरू आहेत. त्यातील सागवान लाकूड, दगड गायब आहेत. त्र्यंबकेश्वर येथील मंदिराच्या बांधकामासंदर्भात ३२ कामांची यादी देण्यात आली. यामध्ये पायरी तुटली, कळस यासह अन्य कामांविषयी सांगण्यात आले.

## हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांसाठीच्या २१ सदनिका आगामी सोडतीत समाविष्ट करण्याचा म्हाडाच्या मुंबई मंडळाचा निर्णय

● मुंबई, विशाल कारंडे :

हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांसाठी राखीव असलेली घोडपदेव येथील २१ घरे गिरणी कामगारांसाठीच्या २,५२१ घरांच्या आगामी सोडतीत समाविष्ट करण्याचा निर्णय म्हाडाच्या मुंबई मंडळाने घेतला आहे. राज्य सरकार आणि इतर सरकारी यंत्रणा २१ हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांचा शोध घेण्यात अयशस्वी ठरल्याने गेली अनेक वर्षे ही २१ घरे रिक्त आहेत. त्यामुळे राज्य सरकारने ही घरे गिरणी कामगारांना सोडतीद्वारे वितरित करावी, असे निर्देश म्हाडाच्या मुंबई मंडळाला दिले आहेत.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हौतात्म्य पत्करलेल्या १०६ जणांमध्ये २३ गिरणी कामगारांचा समावेश होता. या हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांसाठी राज्य सरकारने १२ वर्षांपूर्वी घोडपदेव न्यू हिंद मिल येथील २३ घरे राखीव ठेवली होती. ही घरे हुतात्म्यांच्या वारसांना मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.




त्यांच्या वारसांचा शोध घेत पात्रता निश्चिती करण्याची जबाबदारी गृहनिर्माण विभागावर सोपविण्यात आली होती. त्यानुसार गृहनिर्माण विभागाने वारसांचा शोध घेण्यास सुरुवात केली. मात्र, आजवर २३ पैकी केवळ दोनच वारसांचाच शोध घेण्यात गृहनिर्माण विभागाला यश आले. या दोन वारसांना घराचे मोफत वितरण याआधीच करण्यात आले आहे.

■ मात्र, २१ वारसांचा शोध लागत नसल्याने चार-पाच वर्षांपूर्वी गृहनिर्माण विभागाने देशभरातील महत्त्वाच्या वर्तमानपत्रात वारसांची नावे प्रसिद्ध करून त्यांना कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन केले होते. मात्र यानंतरही वारस पुढे न आल्याने २१ घरे रिक्त आहेत.

■ ही घरे सर्वसामान्य गिरणी कामगारांना सोडतीद्वारे उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव २०२१ मध्ये गृहनिर्माण विभागाकडे पाठविण्यात आला होता. हा प्रस्ताव मान्य करून राज्य सरकारने घोडपदेवमधील २१ घरे गिरणी कामगारांच्या सोडतीत समाविष्ट करावी, असे पत्र गृहनिर्माण विभागाने १९ जून २०२३ रोजी म्हाडाला पाठविले.

■ ‘एमएमआरडीए’च्या भाडेतत्त्वावरील गृहप्रकल्पातील २,५२१ घरे म्हाडाला सोडतीसाठी उपलब्ध असतील. या घरांच्या दुरुस्तीसाठी ‘एमएमआरडीए’ने निविदा मागविल्या आहेत. या वर्षात २,५२१ गिरणी कामगारांच्या घरांची सोडत मार्गी लावण्याचे मुंबई मंडळाचे नियोजन आहे. याच सोडतीत ही २१ घरे समाविष्ट केली जातील.

## ‘मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली देशाने सर्व क्षेत्रात प्रगती केली’- देवेंद्र फडणवीस

● पुणे, अभिजित येरल्लू :

पुणे लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बाणेर, पर्वती भागात सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार माधुरी मिसाळ, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील, गणेश बिडकर यांच्या सह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागील दहा वर्षात पंतप्रधान



नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली आपल्या देशाने सर्व क्षेत्रात प्रगती केली आहे. याच दहा वर्षात चांदणी चौकातील पुल, रस्ते, मेट्रो, इलेक्ट्रिक बस आल्या. तर सर्वाधिक इलेक्ट्रिक बसेस पुण्यात आल्या आहेत. यामुळे प्रदूषण कमी झाले असून पुणेकर नागरिकांचा प्रवास सुखकर झाला आहे. हे सर्व नरेंद्र मोदी यांच्यामुळेच शक्य झाले आहे. तसेच २०१४ पासून बदललेले पुणे आपल्याला बघायला मिळाले आहे. त्यामुळे आगामी काळात आणखी नवीन प्रकल्प पुण्यात येतील आणि पुण्याचा कायापालट होईल. त्यासाठी तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी १३ तारखेला मतदानावेळी मुरलीधर मोहोळ यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे,असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

तसेच ते पुढे म्हणाले की, विकासपुरुष नरेंद्र मोदी आहेत. त्यांच्या समवेत वेगवेगळ्या १८ पक्षांची महायुती आहे. तर राहुल गांधी यांच्यासमवेत २४ पक्षांची खिचडी आहे. त्यांच्याकडे पंतप्रधान पदाचा उमेदवार नाही. २४ नेते संगीत खुर्चीत पाच वर्षे एक याप्रमाणे नेता निवडतील. १४० कोटी लोकांचा नेता निवडण्याची निवडणूक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोधी पर्याय उपलब्ध करू शकले नाहीत. सबका साथ सबका विकास नरेंद्र मोदी करीत आहेत. तर दुसऱ्या बाजूला विरोधकांच्या इंजिनात कुटुंबातील व्यक्तींसाठी जागा आहे आणि नरेंद्र मोदी यांच्या इंजिनात सर्वसामान्यांना जागा असल्याचं सांगत महाविकास आघाडीच्या नेत्यांना त्यांनी सुनावले.

## ‘मोदींच्या प्रचारातील वक्तव्यांनी देशाची मान शरमेने खाली जात आहे’- विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार

● नागपूर, नितीन देवळेकर :



पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणूक प्रचारात ज्या पद्धतीचे मुद्दे उपस्थित करीत आहे ते पंतप्रधान पदाला अशोभनीय असून त्यांच्या वक्तव्यांनी देशाची मान शरमेने खाली जात आहे, असे मत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले. ते शुक्रवारी नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

वडेट्टीवार म्हणाले, मोदींना पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर पराभव दिसायला लागला आणि त्यांनी दुसऱ्या टप्प्यातील भाषणात मंगळसूत्राचा विषय आणला. तेही चालेले नाही तर म्हैस आणली. दोन म्हशी असतील तर एक म्हैस काँग्रेस काढून नेईल, असे म्हणायला सांगू लागले. देशाचे पंतप्रधान एखाद्या जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती सभापतींसारखे बोलत आहेत. यामुळे देशाची मान शरमेने खाली गेली आहे. आता पुन्हा त्यांची भाषा बदलली आहे. त्यांच्या भाषणात पाकिस्तान, मुसलमान, असे मुद्दे आले.

पान २ वर

## संपादकीय

# दाहीदिशा प्रचारासाठी : खरोखर आत्मपरीक्षण करण्याचा प्रश्न

मार्च महिन्यात केंद्रीय निवडणूक आयोगाने सात टप्प्यांतील प्रदीर्घ कार्यक्रम जाहीर केला, तेव्हा देशाच्या पुढल्या पंचवीस वर्षांतील विकासाच्या गप्पा सुरू होत्या. २०४७ पर्यंत आपला देश विकसित देशांच्या रांगेत दिमाखाने जाऊन बसणार, आणि त्यासाठीचा कृतीआराखडा तयारदेखील झाला आहे.

पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी यावेळी चारशेपार जागा जिंकून दिग्विजय घडवतील, असे सांगण्यात येत होते. या 'चारशेपार' जागांनी सर्वांचीच झोप उडवली होती, यात शंका नाही. झोप उडालेल्यांमध्ये जसे 'इंडिया' आघाडीचे नेते होते, तसेच भाजपमधील काही नेतेमंडळीही चकितावस्थेत होती. हे 'चारशेपार' चे प्रकरण कसे जमणार, असा प्रश्न सर्वांना पडला होताच.

कारण मतदानाधिष्ठित लोकशाहीत असले काही ठामपणे सांगता येण्यासारखे नसते. तसे ते नसावेच. लोकांना गृहित धरून काही करायला जावे, तर प्राय: तोंडघशी पडायला होते, हा अनुभव भारतातील भाजप आणि काँग्रेस या दोन्ही सत्ता उपभोगलेल्या पक्षांना पूर्वीही आलेला आहे. तथापि, आता मात्र विकसित भारताच्या स्वप्नावरून प्रचाराचे गाडे गडगडत थेट नेहमीच्या अदानी-अंबानींचा उद्धार, काळ्या धनाचे टेम्पो आणि भारतीय वर्णसंकराच्या नवनव्या सिद्धांतांपर्यंत येऊन थडकले आहे.

निवडणुकीपूर्वी विविध मुद्दे ऐरणीवर आणण्यासाठी विरोधी पक्ष जशी तयारी करतात, तसेच प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडूनही होतात. शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचे प्रश्न, महागाई, बेरोजगारी आदी समस्यांची चर्चा वर्षानुवर्षे होत असते. त्यासाठीच संसद नावाची वास्तू असते. तथापि, निवडणुकीत याच समस्या मुद्दे बनून जनतेपुढे येतात, तेव्हा त्याचे स्वरुप पालटलेले असते. याशिवाय जातीपातीची, धार्मिक ध्रुवीकरणाची गणितेही बांधली जातात.

हल्लीच्या काळात निवडणुकीला राष्ट्रवादाचा आणखी एक झणझणीत तडका दिला जातोच. निवडणुका म्हटले की हे सारे आलेच. ज्याचे कथन जनता स्वीकारते, त्याची सरशी होणार, हे ठरलेले असतेच. परंतु, यंदा प्रथमच असे झाले आहे की, कुठल्याच पक्षाचे नैरेटिव जनतेच्या दरबारात टिकाव धरताना दिसत नाही.

विकासाची भाषा झाल्यानंतर प्रचाराची तुंबळ लढाई राममंदिर, मंगळसूत्र, संविधान खतरे में, आरक्षण, मुस्लिम आरक्षण असले नकोसे पडाव घेत घेत अखेर अदानी-अंबानींपर्यंत आली. महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांची पीडा, चाकरमान्यांची हवालदिली यातला एकही मुद्दा चर्चेपुरताही पुढे आलेला नाही. जनतेचे प्रश्न मांडण्याऐवजी नेतेमंडळींनी आपसातील भांडणेच जनतेत नेलेली दिसतात.

म्हणजे आपली दुखणी बाजूला ठेवून आधी या भांडणांचा निपटारा करण्याचे काम जनतेला करावे लागणार, असे सध्याचे चित्र दिसते. काँग्रेसच्या अनिवासी शाखेचे अध्यक्ष आणि राहुल गांधी यांचे मार्गदर्शक सल्लागार सॅम पित्रोदा यांनी मध्यंतरी वारसाहक्कावरील कराचा मुद्दा उपस्थित करुन भाजपच्या हातात आयते कोलीत दिले होते. त्याचा फायदा उचलत सत्ताधारी काँग्रेससह विरोधकांच्या आघाडीची कोंडी करण्याचा प्रयत्न केला.

ते कमी पडले की काय, असे वाटून बहुधा पित्रोदा यांनी भारतीय वर्णसंकराचा मुद्दा उकरुन काढत आणखी एक फुलटॉस चेंडू भाजपनेत्यांच्या पुढ्यात टाकला. या बोलभांड प्रकारांमुळे काँग्रेसची पंचाईत झाली हे खरे; पण हे देशापुढचे खरे प्रश्न नाहीत, याचाही विसर मतदारांना पडून चालणार नाही. प्रचाराच्या काळात पंतप्रधान मोदी कसलाही विधिनिषेध न बाळगता विरोधकांवर तिखट हल्ले चढवतात.

तेलंगणातील प्रचारसभेत बोलताना बुधवारी त्यांनी अचानक 'राहुल गांधी यांनी आजकाल अदानी-अंबानींचे नाव घेणे का बंद केले? काही सौदा झाला का? काळ्या धनाचे टेम्पो पोचले का?' असा आरोप केला. गेल्या पाच वर्षात गांधी यांनी अनेकदा या दोन्ही उद्योगपतींचा टीकात्मक उल्लेख केला असला, तरी पंतप्रधानांनी कधीही तसे केले नव्हते. राहुल गांधी यांनी व्हिडिओसंदेश प्रसारित करुन पंतप्रधानांना प्रतिआव्हान दिले.

## आजची चित्रोळी



सदैव सावध वावरणारे
चपळाईने फिरताती !
भेदरलेले दिसती जरी हे
झुंजण्यास हे ना डरती !!

मुकुंद कुलकर्णी,
कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई

पान १ वरून...

### 'मोदींच्या प्रचारातील वक्तव्यांनी देशाची मान शरमेने खाली जात आहे'- विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार

तसेच राम मंदिरही आले. पण जनतेने या जुमलेबाज सरकारला सत्तेबाहेर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मोदींनी कोणताही नवीन जुमला आणला तरी जनतेचा त्याला प्रतिसाद मिळत नाही. मोदींचे भाषण सुरू झाले की लोक टीव्ही बंद करतात. अशी अवस्था मोदींची झाली आहे. भाषणाला लोकांच्या टाळ्या नाहीत, लोकांचा प्रतिसाद नाही म्हणून शेवटच्या टप्प्यात अदानी, अंबानी आणावे लागले. पण, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्याला चोख उत्तर दिले आणि मोदींच्या मुद्यातील हवा काढली. मोदी, भाजपाने आता परतीचा मार्ग शोधून ठेवावा एवढीच एक औपचारिकता शिल्लक राहिली आहे, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

### वय ३६, चोऱ्या केल्या ६५

यापुर्वी देखील त्याला अटक करण्यात आली होती. मात्र जामिनावर सुटल्यानंत तो पुन्हा चोऱ्या करायचा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने, पोलीस निरीक्षक संतोष चौधरी (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सनिल पाटील, शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौदरी, गोविंद लवटे आदींच्या पथकाने या अवलिया चोराला पकडण्यात यश मिळवले.

### 'ऑपरेशन मंडे होल्ड'अंतर्गत १२२ संशयीत कंटेनरची सीआययूकडून तपासणी करण्यात येणार

कंटेनर फ्रेट स्टेशन्सचे आणि बंदरांचे उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत कंटेनरची तपासणी करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

नवी मुंबईतील पंजाब कॉनवेअर गोदामात आलेल्या अनेक कंटेनरच्या तपासणीदरम्यान सीमाशुल्क विभागाला या कंटेनरबाबत माहिती मिळाली होती. बंदी घातलेले चिनी फटाके आणि इतर वस्तू सापडल्या होत्या. त्यात निर्यातदाराकडून या वस्तू पाठवण्यात आल्याचा संशय आहे. त्यामुळे या चीनी पुरवठादाराकडून आलेले सर्व कंटेनर थांबवण्यात आले आहेत. त्यातील काही कंटेनर सोडण्यात आले आहेत. पण इतरांची तपासणी सुरू आहे. प्रतिबंधित वस्तूंसह कर चुकवेगिरीबाबतही तपासणी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. धूर करणारे चीनी फटाके आणि फटाक्यांची आयात सीमाशुल्क नियमांनुसार प्रतिबंधित आहे. तसेच त्यांची आयात करण्यासाठी परदेशी व्यापार महासंचालनालयाकडून आयात परवाना आवश्यक असतो. भारतात वितरण आणि विक्रीसाठी प्रतिबंधित फटाके आणि फटाक्यांच्या प्रतिबंधित माल चीनमधून तस्करी केला जातो. गोदामामध्ये उच्च दर्जाचे स्कॅनर उपलब्ध आहेत. त्यानंतरही सीमाशुल्क विभाग या सर्व १२२ कंटेनरचे प्रत्यक्ष तपासणीही करणार आहे.

### हिरानंदानी परीसरात मतदार जोडो पदयात्रेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

संपूर्ण हिरानंदानी इस्टेट परीसरात मॅस्कॉटच्या माध्यमातून नागरिकांचे मनोरंजन करत उपस्थित नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले. येत्या लोकसभा निवडणुकीत सर्व मतदारांनी घराबाहेर पडून जास्तीत जास्त मतदान करीत आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन यावेळी नागरिकांना करण्यात आले.

रस्त्याच्या दुतर्फा बाजूकडील नागरिक, व्यावसायिक, फळ, भाजी विक्रेते या मतदार लोकांना या रॅलीतून मतदान करण्यासाठी जागृती करण्यात आली.. रॅलीमधील मॅस्कॉट सोबत स्वीप कर्मचारी जनजागृती करीत असल्याचे पाहून मतदारांमध्ये एक प्रकारचा उत्साह निर्माण झाला होता.

### भारत-मालदीव संबंधांचा विकास परस्पर हितसंबंध, संवेदनशीलतेवर आधारित; परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचे प्रतिपादन

सहा महिन्यांपूर्वी चीन समर्थक राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोइज्जू यांनी पदभार स्वीकारल्यानंतर मालदीवच्या पहिल्या उच्चस्तरीय भेटीचा एक भाग म्हणून जमीर दिल्लीत आले आहेत. जमीर यांच्याबरोबरच्या संभाषणाची सुरुवात करताना जयशंकर म्हणाले, 'जवळचे आणि निकटचे शेजारी असल्याने, आमच्या संबंधांची वाढ स्पष्टपणे परस्पर हितसंबंध आणि परस्पर संवेदनशीलतेवर आधारित आहे.' ते म्हणाले, 'जोपर्यंत भारताचा संबंध आहे, हे आमच्या नेबरहुड फर्स्ट धोरण आणि सागर (सिक्युरिटी अँन्ड ग्रोथ फॉर ऑल इन द रिजन) दृष्टिकोनातून व्यक्त केले आहे. मला आशा आहे की आजच्या बैठकीत आम्ही विविध क्षेत्रात आमचे दृष्टिकोन मजबूत करू शकू.' मोइझ्झू यांनी मालदीवमधून भारतीय लष्करी जवानांना माघारी घेण्यास सांगितले होते. ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये गंभीर तणाव निर्माण झाला होता.

जयशंकर म्हणाले, 'मालदीवला विकासासाठी मदत करणाऱ्या प्रमुख देशांपैकी भारत एक आहे. आमच्या प्रकल्पांमुळे तुमच्या देशातील लोकांना फायदा झाला आहे. यामध्ये पायाभूत सुविधा प्रकल्प आणि सामाजिक उपक्रमांपासून ते वैद्यकीय स्थलांतर आणि आरोग्य केंद्रांपर्यंतचा समावेश आहे.' ते म्हणाले, 'आम्ही याआधीही अनुकूल अटींवर आर्थिक मदत केली आहे. मालदीवला अनेक प्रसंगी पाठिंबा देणारा भारत हा पहिला देश आहे,' असे जयशंकर म्हणाले.

## राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन



आज ११ मे, आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास महामंडळ ( टी डी बी ) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदशनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या. दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या. अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती. १९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक ( कोडवर्ड ) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला.... ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला... २४ वर्षांनंतर भारताने जमिनीखालुन प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला. ही अणूचाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या अणूचाचणीचा सुगावा लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या ( सीएसआयआर ) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज ( एनएएल ) ने विकसित केले होते. तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना ( डीआरडीओ ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

# पेटंट कायद्यातील बदल कशासाठी ? कुणासाठी ?

विकसित देशांपेक्षा अधिक समाजाभिमुख असलेल्या आपल्या पेटंट कायद्यात करण्यात आलेल्या दोन महत्त्वपूर्ण बदलांचा औषधनिर्मितीच नाही तर कृषी, जैवतंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांमधील कंपन्यांवरही मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

भारत गेली अनेक दशके 'जगाची फार्मसी' म्हणून ओळखला जातो. गेल्या वर्षी प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार, जगभर वापरल्या जाणाऱ्या औषधांपैकी १३% औषधांची भारतात निर्मिती होते आणि ती २०० देशांना पुरवली जातात. तसेच भारतातील लसनिर्मिती करणाऱ्या कंपन्याही अनेक महत्त्वाच्या लशी १७० देशांना पुरवतात. भारताची पेटंट व्यवस्था आणि त्याची कायदेशीर रचना भारतीय औषध उद्योगाच्या यशाचे एक मोठे कारण मानले जाते. परंतु भारताने मार्च २०२४ मध्ये पेटंट कायद्यात काही मूलभूत बदल केलेले आहेत. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे आणि त्यांचे संभाव्य दुष्परिणाम समजून घेणे गरजेचे आहे.

पेटंट म्हणजे कुठल्याही संशोधकाला त्याच्या निर्मितीतून ठरावीक काळासाठी योग्य तो आर्थिक मोबदला मिळवण्यासाठी दिला गेलेला हक्क. प्रत्येक पेटंटची कालमर्यादा ही साधारणतः २० वर्षे असते. औषधाचा शोध लागून, त्याच्या गुणवत्ता आणि सुरक्षिततेच्या चाचण्या होतानाच बहुराष्ट्रीय कंपन्या एका विशिष्ट टप्प्यानंतर पेटंटसाठी अर्ज करून ठेवतात. या हिशेबाने साधारणतः १०-१२ वर्षे पेटंटचा अंमल असेपर्यंत त्या उत्पादनाच्या निर्मितीस इतरांना बंदी असते. कुठलेही संशोधन करण्यास लागणारा मोठा खर्च, काही संशोधन अयशस्वी ठरल्याचे नुकसान, हे सर्व भरून काढण्यासाठी ही प्रणाली महत्त्वाची आहे.

भारताचा पेटंट कायदा १९७० मध्ये अमलात आला. तत्कालीन राज्यकर्त्यांनी भारताची अर्थव्यवस्था आणि उद्योग प्रगत देशांप्रमाणे नसून येथे उत्पादनांवर पेटंट देणे धोक्याचे ठरेल हे जाणले. भारता पेटंट हे उत्पादनावर न देता निर्मिती प्रक्रियेवर दिले जाऊ लागले. एखाद्याने एखाद्या उत्पादनाचा अभ्यास करून त्याच्या निर्मितीची दुसरी प्रक्रिया शोधली, तर त्या उत्पादनाच्या निर्मीतीस त्याला मोकळीक होती. औषधांचा रासायनिक अभ्यास करून त्याच्या निर्मितीची वेगळी प्रक्रिया शोधणे हे शक्य असतेच. पाश्चिमात्य कंपन्यांना प्रचंड मोबदला देण्याची कुवत तेव्हा कोणत्याच देशी औषध कंपनीमध्ये नव्हती. या कायद्याचा वापर करून अनेक औषधी कंपन्यांनी औषधनिर्मितीच्या नवीन प्रक्रिया शोधल्या आणि हळूहळू भारत औषधनिर्माण क्षेत्रातला एक महत्त्वाचा देश गणला जाऊ लागला. आफ्रिकेत १९९०च्या दशकात आलेल्या एड्सच्या साथीत भारतनिर्मित औषधांमुळे लाखो प्राण वाचले हे सर्वज्ञात आहे. जे औषध अमेरिकन कंपन्या १२ हजार डॉलर्स प्रति व्यक्ती प्रति वर्ष विकत होत्या, तेच औषध भारतीय कंपन्यांनी ३६० डॉलर्स प्रति व्यक्ती प्रति वर्ष या किमतीला विकले.

जगातील विद्यापीठे, स्वायत्त किंवा इतर संशोधन संस्था यांच्याकडून अनेक प्रकारचे संशोधन होत असते; कोविडच्या लसनिर्मितीसाठी वापरले जाणारे 'फठअ तंत्रज्ञान हे एक सर्वज्ञात उदाहरण. किफायतशीर, नावीन्यपूर्ण ठरू शकणारे शोध आधीच हेरून ठेवून त्यावर लागणारे संशोधन, उत्पादन, वितरण करण्याची जबाबदारी औषधी कंपन्यांतर्फे घेतली जाते. ही एक परस्परपूरक अशी साखळी असते. आपल्या आर्थिक ताकदीचा वापर करून अनेक औषधी कंपन्या अशी संशोधने आणि कल्पना विकत घेऊन ठेवतात, पण त्यावर अनेक वर्षे काम मात्र होत नाही, याला 'पेटंट होर्डिंग' असे म्हणतात. हे खर्च बडया कंपन्यांना जड जात नाहीत.

मोठया कंपन्यांची पेटंट होर्डिंगची मानसिकता लक्षात घेऊन भारतातील पेटंट कायद्यात एक नियम ठेवण्यात आला. त्याचे दोन पैलू होते. औषधी कंपन्यांना कुठलेही पेटंट नुसतेच घेऊन ठेवता येत नसे, कंपनीने ते वापरणे तरी अपेक्षित होते, नाहीतर इतर कोणाला तरी ते वापरायला देणे अपेक्षित होते. यातले काहीच होत नसेल तर त्या उत्पादनाचा 'सक्तीचा परवाना' पेटंट कार्यालय इतर उत्पादकांना देऊ शकत होते. दरवर्षी पेटंटधारकाला ज्यावर पेटंट घेतले आहे ते संशोधन कसे वापरले गेले, त्यातील देशात आणि विदेशातून आयात केलेल्या उत्पादनाचे प्रमाण, उत्पादनाचा नेमका उपयोग हे सर्व विस्तृतपणे मांडणारा 'फॉर्म २७' अहवाल सादर करणे बंधनकारक होते. त्यामुळे, महाग, पेटंट असलेली औषधे भारतीय कंपन्यांना स्वस्तात उत्पादित करून लोकांना उपलब्ध करून देणे शक्य होत असे. २०१३ मध्ये मूत्रिपडाच्या कर्करोगावर प्रभावी सोराफेनीब हे औषध बाजारात रास्त किमतीला उपलब्ध नाही अशी नाटको या कंपनीने याचिका केल्यावर भारतीय शासनाने 'बेअर'च्या या उत्पादनाचा परवाना 'नाटको'ला दिला. 'बेअर' या औषधाच्या एका महिन्याच्या डोससाठी २,८४,००० रुपये आकारत असे. पेटंट कार्यालयाने आणि नंतर न्यायालयांनी नाटकोला सोराफेनीबचा परवाना देऊ केल्यावर महिनाभर लागणाऱ्या डोससाठी नाटको या औषधाचे दहा हजार रुपये आकारूनही नफा कमावू शकत होती. अनेक अशी औषधे देशातील रुग्णांना केवळ या कायद्यामुळे मिळाली आहेत. कोविड काळात याच नियमाचा वापर करून कोविड लशीच्या उत्पादनाचा परवाना इतर भारतीय कंपन्यांना देऊन किंमत आणखी कमी का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केला गेला होता.

या वर्षी केलेल्या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे फॉर्म २७ मधलीच माहिती अपुरी असल्याने कुठल्याही कंपनीने पेटंट घेऊन त्याचा वापर न करता 'पेटंट होर्डिंग' केले तरी त्या कंपनीला जाब विचारता येणार नाही तसेच इतर कुठल्या कंपनीला त्या औषधाचे उत्पादन करण्यासाठी सक्तीचा परवाना द्यावा, असा युक्तिवाद करणेही अवघड होईल.

अनेक औषधी कंपन्यांची पेटंटच्या बाबतीतली आणखी एक लबाडी म्हणजे 'एव्हरग्रीनिंग' याचा अर्थ म्हणजे एखाद्या मूळ औषधाचे पेटंट संपत आले की त्यात काही किरकोळ रासायनिक बदल करून ते 'नावीन्यपूर्ण' म्हणवून त्यावर आणखी एक पेटंट घेऊन मक्तेदारी शाबूत ठेवायची. भारतीय पेटंट कायद्यामध्ये याविरुद्ध विभाग (३)(ड) ही तरतूद करण्यात आली. कुठल्याही पेटंट असलेल्या उत्पादनात थोडासा फेरफार अथवा क्षुल्लक बदल करून त्यावर नवीन पेटंट दिले जाऊ नये यासाठी पेटंट कार्यालयाकडे या नियमानुसार विरोध नोंदवता येत असे. असा विरोध नोंदवल्यास मूळ उत्पादकाला नवीन पेटंट का दिले जावे याची सफाई देणे बंधनकारक होते. बहुतांश वेळेला या चोरमार्गाने मिळणाऱ्या पेटंटचे समर्थन कंपनी करू शकत नसत आणि परिणामतः 'नवीन' पेटंट आपोआपच रद्दबातल ठरून जुने उत्पादन पेटंटमुक्त होई..

पाश्चिमात्य कंपन्यांचा भारतीय औषधनिर्माण क्षेत्रावर आणि सरकारवर या पेटंट कायद्यातील तरतुदींमुळे प्रचंड रोष होताच. या रोषाची पहिली परिणती दिसली ती १९९५ च्या जागतिक व्यापार संघटनेच्या ट्रिप्स करारात. या कराराप्रमाणे जगभरातील औषधनिर्माण, शेती, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांतील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांच्या शासनांच्या मार्फत विकसनशील देशांवर दबाव आणून पेटंट कायदे 'सुसंवादित' करावेत, म्हणजे थोडक्यात उत्पादनांना पेटंट द्यावे असे बंधन घातले. विकसनशील देशांना : २००५ वर्षांपर्यंत हा कायदा बदलण्याची मुभा देण्यात आली, आणि तो तसा भारताने बदललाही.

भारतात महत्त्वाच्या औषधांवर किंवा उत्पादनांवर कुठलेही पेटंट देताना त्यास कोणीही विरोध करू शकत असे, आणि अशा - कायदेशीर लढायांनी अनेकदा देशाचा फायदाच झाला आहे. देशात - अलीकडेच टऊफ, म्हणजे अर्थात मल्टी ड्रग रेझिस्टंट, क्षयरोगावर प्रभावी ठरणाऱ्या बेडाक्वीलीन या औषधाच्या 'नवीन' पेटंटला विरोध झाला आणि तो यशस्वी ठरला. प्रति रुग्ण ३३ हजार इतका खर्च येण्याऐवजी आता हे औषध अगदी काही हजार रुपयांना बाजारात उपलब्ध होईल. सध्या क्षयरोगावरची औषधे सरकारच क्षयग्रस्तांना पुरवत असल्यामुळे याचा फायदा थेट सरकारच्या - औषधांच्या खर्चावर होणार आहे. आता या कायद्यात दोन मोठे बदल करण्यात आले आहेत. पहिला म्हणजे कुठल्याही पेटंटला विरोध करण्यास कोण 'पात्र' आहे, हे ठरवण्याचा अधिकार पेटंट अधिकाऱ्याला दिला आहे. सरकार कोणतेही असो, औषधी कंपन्यांचे देशातील राज्यकर्त्यांशी (हित ) संबंध असतातच. पेटंट अधिकारी सरकारी कर्मचारी असल्यामुळे पेटंटच्या विरोधकांची 'पात्रता' ठरवण्याच्या प्रक्रियेत सरकारची आवड-निवड किंवा इतर हितसंबंध आड येण्याचा मोठा धोका संभवतो. यातील दुसरा बदल म्हणजे आधीच्या पेटंट कायद्यामध्ये ही विरोध याचिका दाखल करण्यास शुल्क आकारले जात नसे. आता शुल्क असेल आणि ते बदलते असू शकते. ते किमान चार हजार ते २० हजार रुपये आकारले जाऊ शकते. ही रक्कम बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी छोटी असली तरी अनेक स्वयंसेवी संस्था आणि कोणाही व्यक्तीसाठी निश्चितच क्षुल्लक नाही. अशा याचिका लढवताना औषधी कंपन्यांच्या मातब्बर वकिलांच्या फौजेसमोर लढायला लागणारा कायदेशीर खर्च हा वेगळाच.

भारताला हे बदल का करावे लागले याबद्दल अनेक अंदाज आहेत. भारत सरकार सध्या युरोपीय महासंघाबरोबर मुक्त व्यापारी करारांसाठी वाटाघाटी करते आहे, आणि जगातल्या अनेक कंपन्यांची मुख्यालये युरोपमध्ये स्थित आहेत. भारतीय शासनावर या विषयामुळे दबाव येणार हे सर्वत्र ठाऊक होते, आणि त्यासाठी काहीतरी मोर्चेबांधणी करणे गरजेचे होते. परंतु कुठलाही कायदा बदलताना त्यासाठी लागणारी चर्चा, विचारविनिमय हे मात्र इथे झालेले दिसत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांसमोर शरण जाऊनच हे कायदे संमत झाले आहेत असे वाटण्यास वाव आहे. परंतु या बदलांचा दूरगामी परिणाम फक्त सामाजिक आरोग्य कार्यक्रमांवर आणि नवीन, जीवनावश्यक औषधांच्या किमतीवर उपलब्धतेवर सीमित राहणार नाही, तर देशातील औषधनिर्माण क्षेत्रावरही याचे गंभीर परिणाम दिसून येऊ शकतात. आरोग्य क्षेत्राच्या पलीकडेही कृषी, जैवतंत्रज्ञान आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानातील कंपन्यांवरही याचा मोठा परिणाम होईल. पुढील काळात नवीन, परिणामकारक औषधे सर्वत्र उपलब्ध होण्यासाठी आता आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना अधिकच कठीण कायदेशीर लढाई लढावी लागणार आहे, हे मात्र निश्चित.

## लोकसंख्येतील असंतुलित वाढ देशासाठी धोकादायक !

भारतात अल्पसंख्य असुरक्षित आहेत अशी दवंडी भारतातील काही अल्पसंख्यप्रेमी राजकीय नेत्यांकडून तसेच अल्पसंख्य संघटनांकडून पिटली जाते. महासत्ता अमेरिकेकडूनही याबाबत भारताला सातत्याने कानपिचक्या दिल्या जातात. प्रत्यक्षातील चित्र मात्र पूर्णपणे विरोधी आहे हे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालातून जगासमोर आले आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालातून आलेल्या माहितीच्या अनुसार १९५० ते २०१५ या ६५ वर्षांच्या कालावधीत हिंदूंच्या लोकसंख्येत ८ टक्यांनी घट झाली आहे तर मुसलमानांच्या संख्येत ४३.२ टक्यांनी वाढ झाली आहे. १९४७ साली धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झाली. त्यावेळी बहुतांश मुस्लिम पाकिस्तानात गेले. मुस्लिमांचे स्वतंत्र राष्ट पाकिस्तान नावाने उदयास आले. त्यावेळी काही मुस्लिम भारतातच राहिले. भारताने त्यांना संरक्षण दिले. त्यानांतर मुस्लिमांची संख्या देशात झपाट्याने वाढत आहे हेच या अहवालातून दिसून येत आहे. याउलट देशात बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजाची लोकसंख्या ८४.८८ टक्यावरून ७८.०६ टक्यावर घसरली आहे. लोकसंख्येतील ही असंतुलित वाढ अशीच चालू राहिली तर भविष्यात देशातील सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था बिघडण्याची दाट शक्यता आहे. हिंदू समाज हा सहिष्णू असून लोकशाहीची मूल्ये जपणारा समाज आहे.

देशातील वाढती लोकसंख्या, वाढती महागाई, वाढत्या लोकसंख्येमुळे नैसर्गिक स्रोतांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन हिंदूंनी आपली लोकसंख्या नियंत्रित ठेवली असली तरी. ती घटण्यामागे वाढते धर्मांतरण किंवा अन्य काही कारणे नाहीत ना याचाही शोध घेणे आवश्यक आहे. यासोबत अल्पसंख्य समाजाची संख्या झपाट्याने वाढण्यामागे नेमकी काय करणे आहेत याचाही शोध घेऊन त्यावर नियंत्रण आणण्याचे काम सरकारला युद्धपातळीवर करण्याची आज गरज आहे. जागतिक लोकसंख्येच्या बाबतीत भारताने आधीच पहिला क्रमांक पटकावला आहे. रोजगार, वाढती गरिबी, अन्नधान्याचा तुटवडा, हवामानातील असमतोल लक्षात घेता येणाऱ्या काळात वाढती लोकसंख्या नियंत्रित करण्याचे सरकारपुढे मोठे आवाहन असणार आहे आणि त्यासाठी अल्पसंख्य समाजामध्ये त्याबाबत असलेले अज्ञान दूर करण्यासाठी सरकारला प्रयत्न करणे क्रमप्राप्त आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## 5-ठाणे लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाचा हिशोब तपासण्याच्या तारखा जाहीर

ठाणे, (जिमाका) - 25-ठाणे लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूक-2024 मतदारसंघातील उमेदवारांचा खर्च भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक खर्च संनियत्रण नियमावलीतील भाग B १ व भारत निवडणूक आयोगाच्या दि.18 फेब्रुवारी 2019 च्या पत्रानुसार खर्च निरीक्षकांनी दैनंदिन खर्चाचा हिशोब दि.09 मे 2024, दि.13 मे 2024 व दि.18 मे 2024 या तीन दिवशी तपासण्याचे जाहीर केले आहे. यावेळी उमेदवार / प्रतिनिधींनी या नमूद तारखांना उपस्थित राहण्याचे आवाहन 25-ठाणे लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांनी केले आहे. यापैकी आज दि.9 मे 2024 रोजी पहिली खर्च तपासणी बैठक मा. सहाय्यक खर्च निरीक्षक यांचे कार्यालय, करमणूक कर शाखा, 4 था मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे. येथे संपन्न झाली.

### पुढील खर्च तपासणीच्या तारखा

■ दि.13 मे 2024 व दि.18 मे 2024 या असून ही तपासणी सकाळी 10.00 वाजेपासून ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत यावेळेत पार पडेल.

■ उमेदवार/प्रतिनिधींनी सर्व प्रकारच्या नोंदवह्या जसे की, दैनंदिन खर्च नोंदवही, रोख नोंदवही, बँक नोंदवही, संबंधित प्रमाणके/देयके (खर्चाच्या पावत्या), बँक पासबुक व इतर सर्व मूळ कागदपत्रांसह वरील नमूद ठिकाणी व दिनांकास विहीत वेळेत उपस्थित राहण्याबाबत जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

■ वरीलप्रमाणे नमूद दिनांकास उपस्थित राहण्याबाबत उमेदवारांना ई-मेलव्दारेही लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या वेळापत्रकात काही अपरिहार्य कारणांमुळे बदल झाल्यास तसे दूरध्वनी/ई-मेलने कळविण्यात येईल, असे 25-ठाणे लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांनी केले आहे.

## नालेसफाईच्या कामांना नवी मुंबईत वेग

### अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार व शहर अभियंता श्री. संजय देसाई यांची संयुक्त पाहणी



नवी मुंबई - पावसाळापूर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश विशेष आढावा बैठक घेत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मागील आठवडयात दिले असून त्या अनुषंगाने सर्वच विभागांमार्फत सुरु असलेल्या कामांना वेग आलेला आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पूर्वेकडील डोंगररांगांपासून पश्चिमेकडील खाडीला मिळणारे नैसर्गिक नाले असून ते पावसाळी पाणी विनाअडथळा वाहून जाण्यासाठी साफ असावेत यादृष्टीने त्या नाल्यांसह शहराच्या अंतर्गत असलेल्या मोठया नाल्यांचीही पावसाळापूर्व सफाई सुरु आहे.

नमुंमपा क्षेत्रात 77 लहान – मोठे नैसर्गिक नाले असून घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत त्यांच्या सुरु असलेल्या सफाई कामांची अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार आणि शहर अभियंता श्री. संजय देसाई यांनी संयुक्तपणे पाहणी करत या कामांना वेग देण्याच्या व खोल सफाई करण्याच्या सूचना केल्या. याशिवाय सायन-पनवेल महामार्गावर तीन नाल्यांची अभियांत्रिकी विभागामार्फत सफाई करण्यात येत आहे.

नाल्यांमधून जेसीबीव्दारे काढला जाणारा गाळ तसेच काही नाल्यांच्या प्रवाहात व काठांवर असणारी मनुष्यबळ लावून साफ केली जाणारी झाडे झुडपे आणि कचरा काठांवर ठेवला जात असून हा गाळ काहीसा सुकून वाहतूक करण्यायोग्य झाल्यानंतर तत्परतेने त्या ठिकाणाहून हलविण्याची खबरदारी घ्यावी असे निर्देश देत याबाबत हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे निर्देशित करण्यात आले.

या पाहणीमध्ये वाशीतील से-17 नाला, से.12 नाला, से.29 नाला तसेच से.12 व से.8 येथील धारण तलाव त्याचप्रमाणे कोपरखैरणे येथील आलोक नाला, से.2 नाला, घणसोली-कोपरखैरणे नाला या नाले स्वच्छतेची पाहणी करण्यात आली. नाल्यांची साफसफाई, धारण तलावांचे फ्लॅप गेट्स, पंपिंग मशिनरी, स्ट्रेन्चेस अशा विविध कामांची त्यांनी बारकाईने पाहणी केली.

आयुक्त महोदयांनी पावसाळापूर्व कामांसाठी 15 मे ही डेडलाईन दिली असून विहित वेळेत काम पूर्ण करण्याचे संबंधित विभागांनी नियोजन करावे व विशेषत्वाने नैसर्गिक नाले सफाईच्या कामांना वेग दयावा असे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार व शहर अभियंता श्री. संजय देसाई यांनी निर्देशित केले आहे. या पाहणी प्रसंगी संबंधित विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता, स्वच्छता अधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## उष्णतेच्या परिस्थितीत गरजूंना ताक सेवा



कल्याण : 23 एप्रिल 2024 रोजी रेल्वे अपघातात मरण पावलेले अवधेश दुबे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या 26 व्या जयंतीनिमित्त अत्यंत उष्णतेच्या परिस्थितीत गरजूंना ताक वाटप करण्याचा एक हृदयस्पर्शी उपक्रम हाती घेण्यात आला.

अवधेश दुबे इतरांना मदत करण्याच्या त्यांच्या करुणा आणि वचनबद्धतेसाठी ओळखले जातात. त्यांच्या निधनानंतरही दयाळूपणाच्या कृतींना प्रेरणा देत आहेत. त्याच्या वारशाचे स्मरण करण्यासाठी स्वयंसेवकांनी एकत्र येऊन उष्णतेचा सामना करणाऱ्या असुरक्षित समुदायांना दिलासा दिला. वाढत्या तापमानादरम्यान, ताक वितरणाने ताजेतवाने आराम दिला. ज्यांना कठोर हवामानाचा सामना करण्यासाठी झगडत आहेत त्यांना हायड्रेशन आणि पोषण प्रदान केले. या उपक्रमाने केवळ शारीरिक आरामच दिला नाही तर अवधेश यांच्या औदार्य आणि सहानुभूतीच्या चिरस्थायी भावनेचेही प्रतीक आहे. ताक गरजूंना वाटले जात असताना, अवधेशच्या निस्वार्थीपणाचे आणि इतरांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडण्याच्या समर्पणाचे सार ते घेऊन गेले.

## किनवट मालवाहतूक चालक-मालक व ड्रायव्हर संघटना तर्फे नागरिकांसाठी थंड पाण्याची पाणपोईची सुविधा



किनवट - वैशाख वणवे ची सुरुवात झालेली आहे. सूर्यनारायण अगदी प्रचंड ताकदीने आग ओकत आहे. ऊन्हामुळे भल्या-भल्यांची त्राही-त्राही होत आहे. अशा उष्ण वातावरणात खरेदी किंवा इतर कामासाठी बाजारात आलेल्या नागरिकांची तहान भागवण्यासाठी शहरांमध्ये ठीक ठिकाणी पाणपोईची सुविधा करण्यात येते. परंतु किनवट शहरामध्ये यावर्षी पानपोईचा ओस पडलेला दिसतो. विविध राजकीय पक्षांचे नेतेमंडळी, पुढारी, आजी-माजी नगरसेवक तसेच नगरपरिषदेचे इच्छुक उमेदवार आपापले नाव उजेडात आणण्यासाठी पाणपोईची सुविधा करत होते. परंतु यावर्षी नगरपरिषदेचे निवडणूक तोंडावर असताना सुद्धा ही ट्रिक कोणीच वापरताना दिसत नाही.

परंतु कोणताही स्वार्थ न ठेवता फक्त तहानलेल्यांची तहान भागावी म्हणून किनवट मालवाहतूक चालक-मालक व ड्रायव्हर युनियन तर्फे अण्णाभाऊ साठे चौकाजवळ सर्व गाडी मालक व ड्रायव्हर बंधूंनी मिळून लोकांसाठी थंड पाणपोईची सुविधा करून दिली. या परिसरामध्ये नागरिकांना पिण्याचे पाणी सहजासहजी अवगत होत नव्हते. परंतु संघटनेतर्फे ठेवण्यात आलेल्या पाणपोईमुळे गरजू लोकांची तहान भागत आहे. यामुळे युनियनचे परिसरात कौतुक होत आहे.

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघटनेतर्फे सुद्धा किनवट तालुकाध्यक्ष मारोती देवकते, तालुका संघटक रुपेश नगरुलवार, सचीव प्रणय कोवे, उपाध्यक्ष मोईनभाई आणि पत्रकार संघटनेचे इतर सदस्यांनी किनवट मालवाहतूक चालक-मालक युनियनची प्रशंसा केले आहे.

पाणपोईची सुविधा करण्यामध्ये युनियनचे अध्यक्ष खाजाभाई, बालाजी कोल्हे, आसिफभाई, इमरानभाई, विजय डोलारकर, निलेश पवार, जमीलभाई, संकेत भोयर, शिवामामा, मोबीनभाई, समीरभाई, युनूसभाई, सुनील पिंपळे, मारोती जाधव आणि इतर चालक-मालक बांधवांनी परिश्रम घेतले.

## निर्यातबंदी नंतर जेएनपीए बंदरात सात हजार टन कांद्याचे अडकून पडलेले २५० कंटेनर रवाना

उरण - चाळीस टक्के निर्यात शुल्क भरून कांदा निर्यात खुली करण्याच्या केंद्र सरकारच्या आदेशानंतरही काही तांत्रिक अडचणींमुळे तीन दिवसांपासून जेएनपीए बंदरात अडकून पडलेला सुमारे २५० कंटेनरमधील सात हजार टन कांदा अखेर मंगळवारी (७) संध्याकाळपासून रवाना होण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती सीमा शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

ऐन लोकसभा निवडणुकीतच शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याने अखेर केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी नंतर तब्बल १५० दिवसांनी ४० टक्के निर्यात शुल्काची अट कायम ठेऊन कांदा निर्यातीला परवानगी दिली आहे.यासाठी ३ मे रोजी केंद्र सरकारने अध्यादेशही काढला.मात्र अध्यादेश ७ मेच्या संध्याकाळपर्यंत सीमा शुल्क विभागाच्या वेबसाइटवर अपडेटच झालाच नाही. यामुळे जेएनपीए बंदरातुन निर्यातीसाठी पाठविण्यात आलेले कांद्याचे सुमारे २५० कंटेनर बंदर परिसरातील ठिकठिकाणच्या सीएफएस तीन दिवसांपासून अडकून पडले होते. सुमारे सात हजार टन कांदा बंदरातच अडकून पडल्याने वेळेत कांदा निर्यात होऊ शकला नाही. परिणामी झालेल्या विलंबामुळे जहाजाचे भाडे व इतर खर्चही वाढल्याचा जबरदस्त फटका शेकडो कांदा निर्यातदार, व्यापारी आणि शेतकऱ्यांना बसला. केंद्र सरकारच्या ४० टक्के निर्यात शुल्क भरून कांदा निर्यातबंदी उठवून कांदा निर्यात खुली केली आहे.मात्र या निर्यात शुल्कामुळे कांद्याची मागणी कमी होणार आहे.परिणामी कांद्याची निर्यातही कमी होणार आहे. केंद्र सरकारच्या कांदा निर्यातबंदी आणि कांदा निर्यात बंदी उठविण्याच्या राजकीय खेळामुळे मात्र कांदा निर्यातदार, व्यापारी आणि शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे निर्यातदार व्यापारी राहुल पवार यांनी सांगितले.

जेएनपीए आणि सीमा शुल्क विभागाची वेबसाईट तांत्रिक अडचणींमुळे अपडेट होण्यास विलंब झाल्यानेच निर्यातीसाठी पाठविण्यात आलेला सुमारे सात हजार टन कांद्याचे २५० कंटेनर बंदरातच अडकून पडले होते.मात्र ७ मे संध्याकाळपर्यंत वेबसाईट सुरू झाली आणि कांदा निर्यातीचे कामही सुरळीतपणे सुरू झाले असल्याची माहिती न्हावा -शेवा सीमा शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

## डोंबिवली परिसरात राज्य उत्पादन शुल्क डोंबिवली विभागाची मोठी कारवाई



कल्याण : निवडणूक कालावधीत विना परवाना अवैधरित्या मोठ्या प्रमाणात दारूची तस्करी करणाऱ्या टेम्पो ताब्यात घेत चार लाखाचा मुद्देमाल जप्त करत एकाला ताब्यात घेतले आहे. अमित यादव असे तस्करी करणाऱ्या व्यक्तीचे नाव असून हा व्यक्ती डोंबिवलीच्या पलवा कासारियो परिसरातून टेम्पो मधून मोठ्या प्रमाणात दारू घेऊन ग्रामीण भागात जात असताना उत्पादन शुल्कच्या विभागाच्या टीमने चौकशी करत कारवाई केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विजय सुर्यवंशी, अ. व. द. मुंबई संचालक प्रसाद सुर्वे, विभागीय उप- आयुक्त प्रदिप पवार, अधीक्षक डॉ. निलेश सांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक किरणसिंग पाटील, दुय्यम निरीक्षक प्रशांत निकाळजे, सागर धिडसे, रंजित आडे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक एच.एम. देवकते, महिला जवान अमृता नगरकर यांनी कासारीओ रोड, लोढा हेवन, निळजे, डोंबिवली (पुर्व) या ठिकाणी बेकायदेशीर विनापरवाना विदेशी मद्य व बिअर वाहतुकीवर प्रोव्हीबीशन गुन्हा अंतर्गत छापा टाकून गुन्हा नोंदवून एक टेम्पो पकडण्यात येऊन जप्त केली असून एकूण १८८ बल्क लिटर विदेशी मद्य व बिअर असा एकूण ४ लाख १३ हजार ४७० किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

## कपिल पाटील यांच्या प्रचारासाठी शिवसेनेकडून कल्याण पश्चिमेत प्रचारफेरी

### 20 तारखेला महायुतीला मतदान करण्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांचे आवाहन



कल्याण : लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला अवघे 10 दिवस शिल्लक राहिले असून भिवंडी लोकसभेतील एक महत्त्वाचा असलेला कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघ शिवसेनेने पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. आमदार विश्वनाथ भोईर यांच्या पुढाकाराने कल्याण पश्चिमेच्या कानाकोपऱ्यात प्रचार फेऱ्या आणि वैयक्तीक भेटी गाठींवर भर देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

कल्याण पश्चिम विधानसभा हा भिवंडी लोकसभा मतदारसंघातील एक प्रमुख आणि निर्णायक मतदारसंघ संघ आहे. या पार्श्वभूमीवर आमदार विश्वनाथ भोईर यांनी संपूर्ण ताकदीनिशी महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांच्या विजयासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याचाच एक भाग म्हणून आमदार भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली आजपासून कल्याण पश्चिम विधानसभेतील सापर्डे, वाडेघर, उंबर्डे, गांधारी, कोळीवली आदी सर्व गावे आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसरात एकत्रितपणे प्रचाराला जोरदार सुरुवात झाली. प्रचारफेरी सोबतच या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या वैयक्तीक भेटीगाठी घेऊन त्यांना महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांना मतदान करण्याची विनंती केली जात आहे.

20 तारखेला सर्वांनी मतदानासाठी बाहेर पडावे आणि आपला मतदानाचा हक्क बजावावा. महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांना मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत आहे. नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी आपण सर्वांनी महायुतीच्या पारड्यात आपले अनमोल मत टाकण्याचे आवाहन यावेळी आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी केले. तसेच कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भाग हा नेहमीच शिवसेना, भाजप, मनसे आदींच्या पाठीशी उभा राहिला आहे. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी जयवंत भोईर, प्रभूनाथ भोईर, उपशहर प्रमूख सुनिल खारुक, विभाग प्रमूख रामदास कारभारी यांच्यासह विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आगरी समाजातील ज्येष्ठ नेते गुलाब वझे यांचा शिवसेनेत प्रवेश

■ कल्याण ग्रामीणमध्ये उबाठा आणि शरद पवार गटाला झटका

■ उबाठाच्या उपजिल्हाप्रमुखांसह राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला विधानसभा संघटक शेकडो पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह शिवसेनेत

■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला प्रवेश



कल्याण : कल्याण लोकसभेतील कल्याण ग्रामीण भागात उबाठा गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला पुन्हा एकदा झटका बसला आहे. कारण कल्याण ग्रामीणमधील उबाठाचे उपजिल्हाप्रमुख मधुकर पाटील, राष्ट्रवादी पवार गटाच्या विधानसभा संघटक निला पाटील यांच्यासह आगरी समाजातील ज्येष्ठ समाजसेवक, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे, २७ गाव संघर्ष समितीचे दत्ता वझे या सर्वांनी शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांच्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या ठाणे निवासस्थानी हा प्रवेश पार पडला. गेल्या आठवडाभरात कल्याण लोकसभेत उबाठा गटाला हा तिसरा मोठा झटका आहे. यापूर्वी डोंबिवली शहरप्रमुख विवेक खामकर, महिला जिल्हा संघटक कविता गावंड, उपजिल्हाप्रमुख प्रकाश म्हात्रे, माजी नगरसेविका प्रेमा प्रकाश म्हात्रे यांनी काही दिवसांपूर्वीच शिवसेनेत प्रवेश केला होता.

विभाग संघटक मधुकर शेळके, सुषमा ढोले, कैलास पाटील, उपविभाग प्रमुख प्रदीप चुडनाईक, शाखाप्रमुख गिरीश काळण यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या विधानसभा संघटक निला पाटील यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्यासोबत मधुरा खेडकर, सरिता वाघेरे आणि मोठ्या प्रमाणात महिला कार्यकर्त्या आज शिवसेनेत सामील झाल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी त्यांचे शिवसेनेत स्वागत केले.

कल्याण ग्रामीण भागातील आगरी समाजातले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गुलाब वझे, २७ गाव संघर्ष समितीचे नेते आणि माजी सरपंच दत्ता वझे यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. वझे यांचे आगरी समाजात उत्तम संघटन असून आगरी युथ फोरमच्या माध्यमातून आगरी महोत्सवासह विविध उपक्रम, आंदोलने, कार्यक्रम ते राबवत असतात. त्यांच्यासह माजी सरपंच अभिमन्यू म्हात्रे, बाळाराम ठाकूर, वर्गीस म्हात्रे, ज्ञानेश्वर माळी, महेश म्हात्रे यांच्यासह शेकडो ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला.

## "कॉस्मिक अर्बन कनेक्ट- कॉसमॉस" विषयावर चित्रकार जगन यांचे प्रदर्शन

कल्याण : 'कॉस्मिक अर्बन कनेक्ट-कॉसमॉस' आणि इतर सर्व गोष्टींची एकता अमूर्त चित्रांद्वारे व्यक्त करणे, 'प्रसिद्ध कलाकार चित्रकार अभिव्यक्ती, जगन यांचे एकल कला प्रदर्शनाला नेहरू आर्ट सेंटर, वरळी येथे सुरुवात झाली आहे. आठवडाभर चालणारा आर्ट सोलो शो हा कॅनव्हासवर तेल, ऍक्रेलिकच्या उत्कृष्ट मिश्रणातून एक मंत्रमुग्ध करणारा दृश्य प्रवास आहे. जगन स्पष्टपणे दाखवतो की विश्व आणि मानव कसे जोडतात. प्रत्येक चित्र हे अनंत विश्वाच्या प्रवेशद्वारासारखे आहे.



"सुंदरसन जगन्निवासन, ज्यांना प्रेमाने जगन म्हटले जाते, त्यांनी 1995 मध्ये मॅटेक्सनेट सुरू केल्यानंतर एक प्रभावी प्रवास सुरू केला. अतिरिक्त आणि अप्रचलित इन्व्हेंटरीसाठी ऑनलाइन लिलावात ते अग्रणी होते, त्यांनी ही नवीन कल्पना भारतात आणली." मात्र, जगनचा प्रवास तिथेच थांबला नाही. 2017 मध्ये, त्याने ज्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले त्यात मोठा बदल झाला, त्याची खरी आवड – कला आणि चित्रकला. प्रसिद्ध कलाकार एम.जी. यांच्या मार्गदर्शनाने. दोड्डामणी, त्यांनी कलेतून व्यक्त होण्याचा प्रवास सुरू केला. ॲक्रेलिक, ऑइल आणि डिजिटल अशा माध्यमांचे वेगवेगळे मार्ग त्यांनी आजमावले. मी 2017 पर्यंत डूडलिंग करत होतो आणि त्यानंतर मी गंभीर चित्रकला स्वीकारली असे 66 वर्षीय विनोदी कलाकार सांगतात.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, साथीच्या रोगाने आणलेल्या अडचणींमुळे जगनच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली. या वेळी त्याने 200 हून अधिक कलाकृती तयार केल्या, प्रत्येकाने तो किती लवचिक आणि सर्जनशील आहे हे दर्शविते. या कलाकृतींनी 2023 मध्ये चित्र कला परिषद, बंगलोर येथे आयोजित केलेल्या 'कॉस्मिक अर्बन कनेक्ट' या त्यांच्या पहिल्या एकल प्रदर्शनाचा आधार बनला. या प्रदर्शनात, त्यांची कला ठळक आणि नाविन्यपूर्ण होती, जी त्यांच्या अद्वितीय कल्पनांना अमूर्त आणि मूळ पद्धतीने प्रतिबिंबित करते.


# अंकुश चौधरी आणि निर्माते अभिषेक बोहरा येणार पहिल्यांदाच एकत्र



मराठी कलाविश्वाचा सुपरस्टार म्हणून अंकुश चौधरीला ओळखलं जातं. आजवर त्याने 'दुनियादारी', 'दगडी चाळ', 'महाराष्ट्र शाहीर', 'गुरु', 'क्लासमेट्स' अशा अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. सुरुवातीच्या काळात प्रचंड मेहनतीच्या जोरावर अंकुशने कलाविश्वात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. अभिषेक बोहरा फिल्म्स प्रस्तुत एका नव्या मराठी चित्रपटाची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटाचे नाव आणि अन्य बाबी सध्या गोपनीय असल्या तरी या चित्रपटात अंकुश चौधरी प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. बॉलिवूड चित्रपटांची निर्मिती करणारे अभिषेक बोहरा या चित्रपटाच्या माध्यमातून आपल्या पहिल्या मराठी चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. चित्रपटाची पूर्वतयारी सध्या सुरु असून लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येईल.

निर्माते अभिषेक बोहरा म्हणतात, "मराठी चित्रपटांचा आशय हा नेहमीच अर्थपूर्ण असतो. नवनवीन विषय मराठीत हाताळले जातात. त्यामुळेच मला एका चांगल्या मराठी चित्रपटाची निर्मिती करायची होती आणि मला याचा अत्यंत आनंद आहे की, पदार्पणातच मला इतका चांगला चित्रपट करण्याची संधी मिळतेय. त्यात मराठीतील सुपरस्टार अंकुश चौधरी या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारतोय. त्यामुळे सगळंच उत्तम जुळून आले आहे. एक वेगळी कथा असलेला हा चित्रपट प्रेक्षकांचे मनोरंजन नक्कीच करेल. चित्रपटाबद्दलच्या गोष्टी हळूहळू समोर येतीलच, तोपर्यंत प्रेक्षकांना थोडी प्रतीक्षा करावी लागेल."

# 'ये रे ये रे पैसा 3' चित्रपटाचे पोस्टर लॉन्च




मॅड कॉमेडी असलेल्या ये रे ये रे पैसा चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला होता. त्यानंतर "ये रे ये रे पैसा 2" या नावानं आलेल्या या चित्रपटाच्या सिक्वेललाही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं होतं. आता दिग्दर्शक संजय जाधव "ये रे ये रे पैसा 3" (yere ye re paisa 3 ) प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहेत. येत्या दिवाळीमध्ये 1 नोव्हेंबरपासून पुन्हा एकदा मॅड कॉमेडी आणि धावपळीची धमाल रसिक प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉन्च करण्यात आले आहे.

अमेय विनोद खोपकर एलएलपी, उदाहरणार्थ निर्मित आणि न्युक्लिअर ॲरो पिक्चर्स या निर्मिती संस्थांचे सुधीर कोलते, ओंकार सुषमा माने, स्वाती खोपकर, कुमार मंगत पाठक, ओमप्रकाश भट्ट, नासिर शरीफ यांनी "ये रे ये रे पैसा 3" या चित्रपटाची निर्मिती केली आहे तर निनाद नंदकुमार बत्तीन सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा व दिग्दर्शन संजय जाधव यांचे आहे. चित्रपटाची पटकथा सुजय जाधव यांचीच आहे, तर संवाद लेखन अरविंद जगताप यांनी केलं आहे. चित्रपटात संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, विशाखा सुभेदार, उमेश कामत, तेजस्विनी पंडित, आनंद इंगळे, नागेश भोसले अशी तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे.

पैसा मिळवण्यासाठीची धडपड आणि त्यातून होणारे गोंधळ या पूर्वीच्या दोन्ही चित्रपटात पाहायला मिळाले होते. या दोन्ही चित्रपटांचा प्रेक्षकांची तुफान प्रतिसाद दिला होता. त्यामुळे आता "ये रे ये रे पैसा 3" मध्ये आणखी काय वेगळी कथा दाखवली जाणार याची उत्सुकता आहे. उत्तम अभिनेते या चित्रपटात असल्यानं हा चित्रपट प्रेक्षकांचं पुरेपूर मनोरंजन करणार यात काहीच शंका नाही.

# 'बॉर्डर 2' ची रिलीज डेट आली समोर; सनी देओलसोबत दिसणार हा स्टार अभिनेता



1997 मधील ब्लॉकबस्टर चित्रपट बॉर्डरने बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली होती. 1971 मधील भारत-पाकिस्तान युद्धातील एका सत्य घटनेवर आधारीत असलेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिली होती. सनी देओल, सुनिल शेट्टी, अक्षय खन्ना यांच्यासह अनेक कलाकारांच्या यात भूमिका होत्या. मागील काही दिवसांपासून बॉर्डर-2 बद्दल चर्चा सुरू होती.

'बॉर्डर-2' ची रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार भूषण कुमार, जेपी दत्ता आणि निधी दत्ता हे 'बॉर्डर 2' चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. हा चित्रपट अनुराग सिंह दिग्दर्शित करणार आहे. हा चित्रपट 23 जानेवारी 2026 रोजी प्रदर्शित करण्याची योजना आखली आहे. आयुष्मान खुराना आणि सनी देओल हे दोघेही पहिल्यांदाच एकत्र झळकणार असल्याने चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

# लखनऊ पोलिसांचे 10 कोटी थकवले? LSGच्या मालकावर गंभीर आरोप





नवी दिल्ली : आयपीएल 2024चा थरार शिगेला पोहचलेला असताना बुधवारी ८ मेला लखनऊ सुपर जायंट्स आणि सनरायझर्स हैद्राबादमध्ये दमदार सामना पाहायला मिळाला. लखनऊचा हैद्राबादकडून दारुण पराभव झाल्यानंतर लखनऊ संघाच्या प्ले ऑफमध्ये जाण्याच्या आशा संपुष्टात आल्या आहेत. अशामध्ये बुधवारी झालेल्या सामन्यानंतर एक व्हिडियो चांगलाच वायरल झाला होता. लखनऊ संघाचे मालक संजीव गोएंका हे सर्व कॅमेरांसमोर संघाचा कर्णधार के एल राहुलवर संतापले असल्याचे या व्हिडीओमध्ये दिसून येत होता. यानंतर सोशल मीडियावर अनेक जणांनी संजीव गोएंकांवर टीका केली. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांच्यावर लखनऊ पोलिसांचे 10 कोटी थकवल्याचे आरोप लागले आहेत.

आयपीएल 2024मध्ये लखनऊ सुपर जायंट्स या संघाचे मालक संजीव गोएंका हे आहेत. लखनऊमधील इकाना स्टेडियम हे त्यांच्या फ्रँचायझीचे होम ग्राउंड आहे. सुरक्षेसाठी लखनऊ सुपर जायंट्सने लखनऊ पोलिसांना 10 कोटी रुपये द्यायचे होते. मात्र, अद्याप त्यांनी ही किंमत लखनऊ पोलिसांना दिली नसल्याची माहिती 'भारत समाचार' या संस्थेने दिली. इकाना स्टेडियमवर आत्तापर्यंत लखनऊ संघाचे 7 सामने झाले आहेत. यावेळी लखनऊ पोलीस विभागाला फ्रँचायझीने एका दिवसाचे 1.25 कोटी रुपये देणे भाग होते. सामना संपताच पोलिसांना ही रक्कम मिळणे अपेक्षित होते. पण, ही रक्कम अद्यापही मिळालेली नसल्याची माहिती भारत समाचार या वृत्त संस्थेने दिली आहे.

लखनऊ सुपरजायंट्सचे आयपीएल २०२४मधील आव्हान आता संपुष्टात आले आहे. त्यानंतर आता या बातमीने पुन्हा एकदा संघाचे मालक संजीव गोएंका चर्चेत आले आहेत. लखनऊ पोलीस आणि गृहखाते पत्रव्यवहार करण्यात मग्न असून या विषयावर लखनऊचे पोलीस सहआयुक्तांनी सांगितले की, लवकरच पोलिसांना त्यांचे मानधन मिळेल. पण अद्याप संघाकडून यावर कोणतेही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. दरम्यान, गोएंका आणि राहुलचा व्हिडीओ वायरल झाल्यांनतर त्यांच्यावर सोशल मीडियावर ट्रोलर्सने चांगलेच ट्रोल केले. 'भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूसोबत लाईव्ह कॅमेरांसमोर असे वागणे बरे नाही.' अशा प्रकारच्या कमेंट्स पाहायला मिळाल्या.

# बांगलादेशविरुद्धच्या टी-20 सामन्यात शेफाली वर्माने मोडला सचिन तेंडुलकरचा रेकॉर्ड



नवी दिल्ली : भारतीय महिला क्रिकेट संघाची दमदार फलंदाज शेफाली वर्माने बांगलादेशविरुद्धच्या पाचव्या टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात एका विक्रमाची नोंद केली आहे. आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील आपला 100वा सामना खेळण्यासाठी शेफाली बांगलादेशविरुद्ध सिल्हेटमध्ये मैदानात उतरली होती. मैदानावर पाऊल ठेवताच तिने मास्टर-ब्लास्टर क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचा 30 वर्षं जुना विक्रम मोडला.

बांगलादेशदेशविरुद्ध काल, गुरुवारी खेळला गेलेला पाचवा टी-20 सामना शेफाली वर्माच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील 100वा सामना होता. भारतीय पुरुष क्रिकेट संघ आणि महिला क्रिकेट संघ यामध्ये 100वा आंतरराष्ट्रीय सामना खेळणारी शेफाली ही सर्वात तरुण खेळाडू ठरली. शेफाली वर्माने वयाच्या 20 वर्षे 102 दिवशी हा टप्पा गाठला. सचिन तेंडुलकरने वयाच्या 20 वर्षे 329 दिवसांत 100वा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. शेफालीने वेस्ट इंडिजच्या शमीन कॅम्पबेल हिलाही मागे टाकले. तिचे वय 21 वर्षे आणि 18 दिवस असताना 100वा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता.

बांगलादेशविरुद्धच्या पाचव्या टी-20 सामन्यात शेफालीची कामगिरी समाधानकारक नव्हती. तिला 14 चेंडूत केवळ 14 धावाच करता आल्या. शेफालीने बांग्लादेशविरुद्ध खेळल्या गेलेल्या टी-20 मालिकेच्या 5 डावांत 19.60च्या सरासरीने 98 धावा केल्या.

**बांगलादेशला व्हाइटवॉश**

बांगलादेशमध्ये 5 सामन्यांची टी-20 मालिका झाली. भारतीय महिला क्रिकेट संघाने प्रभावी कामगिरी करत पाचही सामन्यांत बांगलादेशवर विजय मिळवला. या मालिकेत भारताकडून स्मृती मानधनाने 5 डावांमध्ये सर्वाधिक 116 धावा केल्या. तर, राधा यादवने 5 डावांमध्ये 10 विकेट्स घेतल्या आहेत. पाचव्या सामन्यात भारताने बांगलादेशसमोर 157 धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र, भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर बांगलादेशचे फलंदाज ढेपाळले. 6 विकेट्स गमावून बांगलादेशने 135 धावा केल्या. राधा यादवने 3 विकेट्स घेतल्या.

पाचव्या सामन्यात भारतीय महिला संघाने 20 षटकांमध्ये 5 विकेट्स गमावून 156 धावा केल्या. यामध्ये दयालन हेमलथाने 37 धावांची तर स्मृती मानधनने 33 धावांची खेळी केली. कर्णधार हरमनप्रीत कौरनेदेखील 30 धावा केल्या. यावेळी बांगलादेशकडून राबिया खान आणि नाहिदा अख्तरने प्रत्येकी 2 विकेट्स घेतल्या, तर सुल्ताना खातूने 1 विकेट घेतली. त्यानंतर 157 धावांचा पाठलाग करण्यास उतरलेल्या बांगलादेश संघाची सुरुवात धीम्या गतीने झाली. बांगलादेशच्या रितू मोनीने सार्वधिक 37 धावा केल्या. राधा यादवने सर्वाधिक 3 विकेट्स तर शोभनाने 2 आणि तितास साधूने 1 विकेट घेतली.

# दैनिक राशी भविष्य

**मेष** - शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले. अशा प्रवासासाठी तुम्ही कमकुवत आहात, त्यामुळे हा प्रवास तुम्हाला आणखीनच कमकुवत बनवेल. जे लोक शेअर बाजारात पैसा लावतात आज त्यांना नुकसान होऊ शकते. वेळेवर सचेत राहणे तुमच्यासाठी उत्तम असेल.

**वृषभ** - आजच्या दिवशी तुम्ही आराम करु शकाल. शरीराला तेलाने मसाज करुन तुमचे स्नायू मोकळे करा. आज तुमच्या आई-वडिलांपैकी कुणी धन बचत करण्यासाठी लेक्चर देऊ शकतात तुम्हाला त्यांच्या गोष्टी व्यवस्थित ऐकण्याची आवश्यकता आहे अथवा येणाऱ्या काळात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**मिथुन** - तुम्ही बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल. या प्रक्रियेत तुम्ही विनाकारण मानसिक त्रास करून घ्याल. सदोदित तुमच्यातील लहान मूल कार्यरत ठेवण्याची तुमची क्षमता गमावून बसलात हे तुमच्या चिंतेचे मुख्य कारण ठरेल. त्यामुळे तुम्ही त्रस्त व्हाल.

**कर्क** - अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया नका घालवू. एक लक्षात ठेवा वादविवाद चर्चांमधून काहीही हाती लागत नाही, तर काहीतरी हरवतेच.

**सिंह** - संध्याकाळी जरा क्षणभर विश्रांती घ्या. अनेक माध्यमातून आर्थिक लाभ होतील. घरातील दुरुस्तीची कामे अथवा सामाजिक भेटीगाठी तुम्हाला व्यस्त ठेवतील.

**कन्या** - नैराश्याच्या जाणीवेला तुमच्यावर हावी होऊन देऊ नका. आज तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे. वयोवृद्धाची तब्येत तुमच्या काळजीचे कारण ठरू शकते.

**तुळ** - सातत्याने सकारात्मक विचार करण्याची प्रवृत्ती फलदायी ठरेल. तुम्हाला यश मिळेल. तुम्ही इतरांवर अतिखर्च करण्यासाठी पुढाकार घ्याल.

**वृश्चिक** - वाहन चालविताना काळजी घ्या. या राशीतील मोठ्या व्यावसायिकांना आजच्या दिवशी खूप विचार करून पैसा गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे.


**धनु** - तणावामुळे किंचित आजारी पडण्याची शक्यता आहे. त्यातून विश्रांतीसाठी मित्रमंडळी, कुटूंबातील सदस्य यांच्यासोबत वेळ घालवा. आज केलेली गुंतवणूक तुमच्या समृद्धी आणि आर्थिक सुरक्षिततेला पूरक ठरेल.

**मकर** - मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल, पण अतिखाणे दुस-या दिवशी त्रासदायक ठरू शकते. आर्थिक रूपात आज तुम्ही बरेच मजबूत असाल ग्रह नक्षत्रांच्या चालीने आज तुमच्यासाठी धन कमावण्यासाठी बरीच संधी मिळेल.

**कुंभ** - राग अनावर झाल्याने बाचाबाची आणि संघर्ष होऊ शकतो. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो. तुम्ही त्यांना धन देण्यापूर्वी त्याची विश्वसनीयता जाणून घ्या अथवा धन हानी होऊ शकते.

**मीन** - अतिशय प्रभावी व्यक्तींच्या पाठिंब्यामुळे तुमचे मनोधैर्य उंचावेल. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून आजच्या दिवशी तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते आणि तुम्ही कुठल्या मोठ्या अडचणींमधून निघू शकतात.

# डायबिटीज मध्ये हे आसन नक्कीच तुम्हालाही फायदाच देतील




1. कपालभाती प्राणायाम कपालभाती प्राणायाम आपल्या मज्जातंतू आणि मेंदूच्या नसाला ऊर्जा प्रदान करते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हा प्राणायाम खूप चांगला आहे, कारण यामुळे ओटीपोटात स्नायू सक्रिय होतात. हा प्राणायाम रक्त परिसंचरण सुधारतो आणि मनाला शांती देतो.

2. सुप्त मत्स्येन्द्रासनः- हे आसन शरीराच्या अंतर्गत अवयवांचे मालिश करते आणि पचन क्रिया सुधारण्यास मदत करते . हे आसन ओटीपोटात अवयव सक्रिय करते.

3. धनुरासन हे आसन स्वादुपिंड सक्रिय करते आणि मधुमेहाच्या रुग्णांना अत्यधिक फायदेशीर ठरते. या योगासनाने ओटीपोटात अवयव बळकट होतात आणि पोटावरील तणाव कमी होतो.

4. पश्चिमोत्तानासन हे आसन पोट आणि पेल्विक अवयवांना सक्रिय करते, जे मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर आहे. तसेच शरीरात उर्जा वाढवते आणि मनाला शांती देते.

5. अर्धमत्स्येद्रासन हे आसन ओटीपोटाच्या अवयवांची मालिश करते आणि फुफ्फुसांमध्ये ऑक्सिजनचे प्रमाण वाढवते. तसेच मणक्याला बळकट करते. हे योगासन केल्याने मन शांत होते, व पाठीच्या मक्यास सुरळीत रक्त पुरवठा होतो.

6. शवासनः- शवासन संपूर्ण शरीर आराम देते. हे आसन एखाद्या व्यक्तीला खोल मनः स्थितीत घेऊन जाते, जेणेकरून मन शांत आणि नवीन उर्जेने परिपूर्ण होते.

7. सेतुबंधासनः- मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी ही आसन खूप फायदेशीर आहे. हे केवळ ब्लड प्रेशरवर नियंत्रण ठेवत नाही तर मनाला शांतता व विश्रांती देते. नियमित केल्याने पाचन तंत्र ठीक होते मान आणि मणक्याचे ताणण्याबरोबरच स्त्रिया मध्ये मासिकपाळीत आराम देते.

8. हलासनः- हे आसन दीर्घकाळ बसून काम करणाऱ्या लोकांसाठी फायदेशीर आहे. हे घशातील, फुफ्फुसातील आणि इतर अवयवांच्या ग्रंथीला उत्तेजित करते, ज्यामुळे संपूर्ण शरीरात रक्ताचा संचार होतो.

# जास्तपाणी पिणे धोकादायक



आज काल भरपूर पाणी प्या असा सल्ला दिला जातो, त्यात किडनी स्टोन चा त्रास असणाऱ्या लोकांचा तर जास्त पाणी पिण्यावर आणखीनच जोर असतो, परंतु जास्त पाणी पीने देखील आरोग्यास हानिकारक आहे, आपल्या शरीरात 70 टक्के पाणी असते. त्यामुळे दिवसभरात योग्यप्रमाणात पाणी पित राहावे. पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट राहते पण जास्त पाणी प्यायल्याने ओवरहाइड्रेशनचा त्रास तुम्हाला होऊ शकतो.

**हृदय :-** जास्त पाणी प्यायल्याने हार्ट फेलियर होऊ शकते. जास्त प्यायल्याने शरीरामध्ये रक्ताचे प्रमाण वाढते ज्याचा दबाव हृदयांच्या नसांवर निर्माण होतो. जास्त दबावाने हार्ट फेलियर होऊ शकते. त्यामुले योग्य प्रमाणात पाणी प्यावे.

**किडनीचा त्रासः-**

जेव्हा आपण जास्त पाणी पितो, तेव्हा आर्जिनिन वॅसोप्रेसिनचा प्लाज्मा स्तर कमी होतो. याचा थेट परिणाम किडनीवर होतो. त्यामुळे पाणी योग्य प्रमाणात प्यावे. शरीर ओवरहाइड्रेशन झाले तर सोडियमचे प्रमाण देखील कमी होते. त्यामुळे मेंदूला सूज येऊ शकते. मेंदूला परिणाम झाल्याने विचार करण्याची क्षमता देखील कमी होते.

**यकृतः-** iron (लोह) चे प्रमाण जास्त असलेले पाणी प्यायल्याने देखील ओवरहाइड्रेशन होते. iron (लोह) चे प्रमाण जास्त असलेले पाणी प्यायल्याने यकृतासंबंधित आजार होऊ शकतात.

**जास्त सोडीयम आणि कमी पोटॅशियम**

जास्तीचे सोडीयम आणि कमी प्रमाणात पोटॅशियमच्या सेवनामुळे जास्त तहान लागते. जास्त प्रमाणात मिठ खात असल्यास शरीर जास्तीच्या पाण्याची मागणी करते. जास्त मिठ खाल्याने शरिरातील सेल्समधून मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर पडत असते. जास्त पाणी पिल्याने ओवर-हायड्रेशन होते. यामुळे उलटी होणे, डोकेदुखी, मानसिक स्थिती बिघडणे.

उदा. भ्रम किंवा विचलन अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

दिवसातून 10 ते 12 ग्लास पाणी पिणे आदर्श मानलं जातं. व्यक्तीची उंची, वजन, व्यायामाची पद्धत यावरुन पाण्याच्या प्रमाणात वाढ होऊ शकते.

# दिनविशेष

**घटना**

१९९९: टेनिस सम्राज्ञी स्टेफी ग्राफ हिने जर्मन खुल्या टेनिस स्पर्धेत आपल्या कारकिर्दीतील १,००० वा सामना खेळण्याचा एक वेगळा विक्रम प्रस्थापित केला.

१९९८: २४ वर्षांनंतर भारताने पुन्हा राजस्थानच्या वाळवंटातील पोखरणच्या परिसरात हायड्रोजन बॉम्बनिर्मितीसाठीच्या साधनासह तीन यशस्वी आण्विक चाचण्या केल्या.

१९९६: १९९६ माउंट एव्हरेस्ट आपत्ती - एकाच दिवसात माउंट एव्हरेस्टच शीखर चढणाऱ्या ८ लोकांचे निधन झाले.

१९४९: इस्त्रायलचा संयुक्त राष्ट्रांत (United Nations) समावेश झाला.

१८८८: मुंबईतील मांडवी येथील कोळीवाड्यात थोर समाजसुधारक जोतिबा फुले यांना रावबहादूर वड्डेदार यांनी महात्मा ही पदवी दिली.

१८६७: लक्झेंबर्गला स्वातंत्र्य मिळाले.

१८५८: मिनेसोटा अमेरिकेचे ३२ वे राज्य झाले.

१८५७: १८५७ चा राष्ट्रीय उठाव भारतीयांनी ब्रिटिशांकडून दिल्ली ताब्यात घेतली.

१५०२: ख्रिस्तोफर कोलंबस आपल्या ४ थ्या आणि अखेरच्या सफरीवर वेस्ट इंडिज बेटांकडे निघाला.

**जन्म**

१९७५: हॅरिएट क्विंबी - एरो क्लब ऑफ अमेरिका एव्हिएटरचे प्रमाणपत्र मिळवणाऱ्या पहिल्या अमेरिकी महिला, तसेच इंग्लिश खाडी पार करणाऱ्या पहिल्या महिला पायलट. (निधनः १ जुलै १९१२)

१९६०: सदाशिव अमरापूरकर - भारतीय अभिनेते (निधनः ३ नोव्हेंबर २०१४ )

१९४६: रॉबर्ट जार्विक - कृत्रिम हृदय विकसित करणारे कार्डियोलॉजिस्ट

१९१८: रिचर्ड फाइनमन - अमेरिकन पदार्थवैज्ञानिक - नोबेल पुरस्कार (निधनः १५ फेब्रुवारी १९८८)

१९१६: कॅमिलो जोसे सेला - स्पॅनिश लेखक आणि राजकारणी - नोबेल पुरस्कार (निधनः १७ जानेवारी २००२)

१९१४: ज्योत्स्ना भोळे - गानसम्राज्ञी, गायिका आणि अभिनेत्री - लता मंगेशकर पुरस्कार (निधनः ५ ऑगस्ट २००१)

१९१२: हसन मंटो - भारतीय- पाकिस्तानी लेखक आणि पटकथालेखक सादत (निधन : १८ जानेवारी १९५५)

**निधन**

२०२२: पंडित सुख राम - राजकारणी, खासदार आणि मंत्री (जन्मः २७ जुलै १९२७)

२०२२: भगीरथ प्रसाद त्रिपाठी - भारतीय संस्कृत व्याकरणकार, भाषाशास्त्रज्ञ व योगी - पद्मश्री (जन्मः १५ जुलै १९३५) २०२२: रमेश लटके - भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे आमदार (जन्मः २१ मे १९७०)

२००९: सरदारिलाल माथादास नंदा - भारतीय नौसेनाधिपती (जन्मः १० ऑक्टोबर १९१५)

२००४: कृष्णदेव मुळगुंद - चित्रकार व नृत्यदिग्दर्शक (जन्मः २७ मे १९१३)

१९९६: ननामदी अझीकीवे - नायजेरिया देशाचे पहिले अध्यक्ष (जन्मः १६ नोव्हेंबर १९०४)



# पुरुषांसाठीचा डिझाईनर वेडिंग वेअर ब्रँड 'तस्वा'चे पहिले मॉल स्टोअर मुंबईत सुरू

## आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लि. आणि अग्रगण्य डिझाईनर तरुण ताहिलियानी यांची निर्मिती

मुंबईः प्रसिद्ध डिझाईनर तरुण ताहिलियानी यांच्या सहकार्याने आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेड यांना मुंबईतील 'तस्वा'च्या पहिल्या मॉल स्टोअरची घोषणा करताना अभिमान वाटत आहे. अचानक उसळलेला फ्लॅश मॉब आणि पुणेरी ढोलपथकाचे सादरीकरण यांमुळे उपस्थित स्तंभित झाले आणि हा भव्य उद्घाटन सोहळा नेत्रदीपक ठरला. या फ्लॅश मॉबमध्ये बॉलिवूड स्टार आणि ब्रँड अम्बॅसिडर असलेली अनन्या पांडे हिने प्रवेश केला तेव्हा उपस्थितांना आश्चर्याचा धक्का बसला. प्रसिद्ध फॅशन डिझाईनर तरुण ताहिलियानी यांच्या उपस्थितीत अनन्या पांडे हिने या स्टोअरचे उद्घाटन केले.

हे स्टोअर 'तस्वा' क्र. एस/4, दुसरा मजला, ओबेरॉय मॉल, गोरेगाव पूर्व, मुंबई येथे असून ते १७४६ चौरस फूट भागात पसरलेले आहे. ते एका आलिशान खरेदीचा अनुभव देते. या स्टोअरमध्ये आधुनिक भारतीयांसाठी डिझायनर एथनिक आणि लग्नाच्या पोशाखांची विस्तृत श्रेणी मांडलेली आहे. त्यामध्ये नवीन आर्ट डेको-प्रेरित डिनर जॅकेट कलेक्शनचाही समावेश आहे. त्यावर भौमितिक आकृत्या आणि ॲप्लिक व हॉट-फिक्स यांसारख्या भरतकामाच्या गुंतागुंतीच्या तंत्रांचा समावेश आहे. लग्नाच्या आणि उत्सवाच्या पोशाखांच्या श्रेणीमध्ये विविध प्रकारचे कुर्ता सेट, अचकन, शेरवानी आणि इंडो-वेस्टर्न पोशाखांचा समावेश आहे. त्याला पूरक म्हणून साफा, सरपेच, ब्रोचेस, पॉकेट स्क्वेअर, बटणे, सेहरा, स्टोल्स, शाल आणि पादत्राणे यांसारख्या ॲक्सेसरीज आहेत.

या स्टोअरची रचना आणि सजावट तरुण ताहिलियानी यांच्या 'इंडिया मॉडर्न' डिझाईनच्या पद्धतीनुसार असून यामध्ये भारतीय ग्राहकांमध्ये विकसित झालेल्या नवीन वास्तवाचे प्रतिबिंब आहे. ते आता स्वतःच्या निवडींमधून अधिक अर्थ आणि अभिव्यक्तीचा शोध घेतात. लाकूड, पितळ यांसारख्या आलिशान साहित्य आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशातून प्रेरित अशा डिझाईन्स यांमधून एक असे वातावरण तयार होते जे भारतीय पोशाखांच्या नवीन जगासाठी प्रवेशद्वार म्हणून कार्य करते. 'तस्वा'च्या ब्रँड तत्त्वज्ञानाशी ते सुसंगत आहे.

अनन्याने आपले विचार व्यक्त करताना सांगितले, ₹या शहराचे माझ्या हृदयात एक विशेष स्थान आहे. आज ओबेरॉय मॉलमध्ये 'तस्वा'ने आपले दरवाजे उघडले आहेत. पारंपारिक अभिजातता आणि समकालीन शैली यांचा हा मिलाफ पाहणे हा माझा गौरव आहे. नवरदेवांच्या फॅशनच्या अनुभवाला नवीन उजाळा देण्यासाठी 'तस्वा' कटिबद्ध आहे आणि तिची ही कटिबद्धता कौतुकास्पद आहे. 'तस्वा'च्या या प्रवासाचा एक भाग बनण्यास मी उत्सुक आहे."

ओबेरॉय मॉल स्टोअरच्या शुभारंभाबाबत बोलताना 'तस्वा'चे चीफ डिझाईन ऑफिसर तरुण ताहिलियानी म्हणाले, "मुंबईच्या ओबेरॉय मॉलमध्ये आमच्या स्टोअरच्या भव्य उद्घाटनाद्वारे आमचे स्वप्न साकार करणे ही सन्मानाची बाब आहे. 'तस्वा'मध्ये प्रत्येक पोशाखाची बारकाईने रचना केली जाते जेणेकरून समकालीन शैलीचा स्वीकार करत आपल्या वारशाचा गौरव व्हावा. कालातीत तंत्र आणि आधुनिक डिझाइन्स यांचा संगम अनुभवण्यासाठी आमचे नवीन मुंबई स्टोअर ही योग्य जागा आहे. 'तस्वा'ची तीच ओळख आहे."

'तस्वा'चे ब्रँड हेड आशिष मुकुल आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, "'तस्वा'मध्ये आम्ही धोरणात्मकरीत्या किरकोळ व्यापाराचा विस्तार करत आहोत. मुंबईतील ओबेरॉय मॉलमध्ये आमच्या पहिल्या मॉल स्टोअरचे भव्य उद्घाटन हा या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. डिझायनर वेडिंग वेअरच्या संदर्भात सहजसुलभता आणिउच्च दर्जाच्या गुणवत्तेबाबत आमच्या कटिबद्धतेचे हे स्टोअर प्रतीक आहे."

# खरीपासाठी मिळणार यंदा मुबलक बियाणे; बियाण्याचे पाकिट रु. ८५३ ला



मालेगाव : मालेगाव तालुक्यात गतवर्षी २७ हजार ३३० हेक्टरवर कपाशीची लागवड झाली होती. आगामी २०२४ च्या खरीप हंगामात तालुक्यात तेवढीच कपाशीची लागवड अपेक्षीत आहे. कपाशीसाठी साधारणतः एक हेक्टर क्षेत्रासाठी ४७५ ग्रॅम वजनाची ३ बी.टी. कॉटन पाकीटे लागतात. चालू वर्षात कपाशी बियाण्याच्या एक पाकिटाची किंमत ८५३ रुपये इतकी असेल.

२०२४ वर्षात कपाशी लागवडीसाठी एक लाख बी. टी. कॉटन पाकीटे लागणार असून भरपूर प्रमाणात बियाणे उपलब्ध होणार असल्याची माहिती उपविभागीय कृषि अधिकारी गोकुळ आहिरे यांनी कळविली आहे. खरीप हंगामात शेंदऱ्या बोंडअळीचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी क्षेत्रिय पातळीवर आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे.

हंगामपूर्व कपाशी लागवड झाल्यास शेंदरी बोंड अळीचा जीवनक्रमास पोषक वातावरण निर्माण होऊन प्रादुर्भाव वाढण्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असते. शेंदरी बोंड अळीचा जीवनक्रम खंडीत होण्यासाठी हंगामपूर्व कपाशीची लागवड होणार नाही यादृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे.

# नगरोली तांबडी आदिवासी वाडी पिण्याच्या पाण्यावाचून वंचित

■ पावसाळी व्हलचे पाणी आणि उन्हाळ्यात डव-याचे पाणी

■ चांदा ते बांधा पर्यंत विकासाच्या गप्पा मारणारे नेते फेल.



वावेदिवाळी इंदापूर - ३२ रायगड लोकसभा आणि श्रीवर्धन विधानसभा मंतदार संघातील माणगांव तालुक्यातील इंदापूर विभागातील पोटणेर ग्रूप ग्रामपंचायत हद्दि मधील नगरोली तांबडी आदिवासी वाडी ही भारत देशाला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे झाली तरी ही आदिवासी वाडी पिण्याच्या पाण्यावाचून व अतंर्गत रत्यावाचून आज देखील वंचित राहिली असून या आदिवासी मधील नागरिकांची महा भयंकर परिस्थिती पाहवयास मिळत असून चांदा ते बाधा पर्यंत आम्ही विकास करतो म्हणणारे लोक प्रतिनिधी देखील यावेळी आदिवासी वाडीची ही गंभीर परिस्थिती पाहून फेल झाले आसल्यचे दिसत असून फक्त निवडणुका जाहीर झाल्या की या आदिवासी वाडी मध्ये मतदानासाठी नेते आणि पुढारी येत असता निवडणुका झाल्या की दुर्लक्ष करतात असे येथील देखील आदिवासी बांधवानी बोलताना सांगितले

इंदापूर शहराच्या काही हाकेच्या आंतरावर तळा मेन रोड वरून दोन किलोमीटरवर ही आदिवासी वाडी असून एकूण पंचवीस ते तीस घरे याआदिवासी वाडीत वास्तव्य करीत असून या वाडीचा आद्यप कोणत्याही प्रकारे विकास झाला नसल्याचे या आदिवासी नागरिकांन मधून सांगण्यात आले.निवी मुठवली नदीला खडसाबळे धरणाचे पाणी हे येत असून हे पाणी बाराही महिने या नदीला असल्याने या नदी मध्ये उन्हाळ्यात एक छोटासा डवरा काढून त्या मध्ये सांचलेले पाणी हे आदिवासी बांधव नंबर प्रमाणे भरत असतात.डोंगर भागात वसलेल्या या आदिवासीवाडीला जाण्या येण्यासाठी रस्ता नसून पावसाली नदी ओड्याला पाणी आले की या नागरिकांना कामा धंद्यासाठी जाण्यास मार्गच नसतो.तसेच यांच्या मुलांना शिक्षणासाठी देखील शाळा नसून या नगरोली तांबडी आदिवासी वाडीतील मुलांची भविष्य धोक्यात असून तसेच नागरीकाची फार मोठी दयनीय अवस्था आज पाहवयास मिलत असून शासनाने याकडे गांभिर्याने लक्ष घालावे

# आता विधान परिषद निवडणुकीचे रणांगण

■ काँग्रेसला बहुमत मिळविण्याची संधी

■ 'इतक्या' जागांसाठी अधिसूचना जारी



बंगळूर : राज्यात लोकसभेसाठी मतदान झाले असून, राजकीय पक्ष ब्रेक घेण्याच्या मनस्थितीत नाहीत. आता विधान परिषद निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. सर्व काही अपेक्षेप्रमाणे झाले तर विधान परिषदेत काँग्रेसचाच वरचष्मा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सभापतीपदही काँग्रेसकडे जाण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, आज विधान परिषदेच्या सहा जागांसाठी अधिसूचना जारी झाली.

पुढील काही आठवड्यांमध्ये बऱ्याच विद्यमान परिषद सदस्यांचा कालावधी संपणार आहे. शिक्षक आणि पदवीधरांच्या मतदारसंघांसह (Graduate Constituency) १८ परिषद जागांसाठी निवडणुका होतील. सध्या ७५ सदस्यांच्या सभागृहात परिषदेच्या अध्यक्षांसह ७० सदस्य आहेत. त्यापैकी काहींनी त्यांच्या पदांचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे १८ पदे रिक्त राहणार आहेत. त्यापैकी ११ सदस्य विधानसभेतील आमदारांकडून निवडून आले आहेत, तर सहा शिक्षक आणि पदवीधर क्षेत्रातून निवडून आले.

पहिल्या तीन टप्प्यांनी मोदींना अस्वस्थ केलंय, राज्यात 'महाविकास'ला 30 ते 35 जागा मिळणार; शरद पवारांना विश्वास

विधानसभेत १३६ आमदारांसह काँग्रेसचे वर्चस्व आहे. त्यामुळे आठ आमदारांना निवडून येण्याची संधी आहे. पण भाजप-धजद युतीचे केवळ चारच सदस्य निवडून येऊ शकतात. वरीष्ठ सभागृहात काँग्रेसचे बहुमत नसल्याने विधानसभेत मंजूर झालेली अनेक विधेयके परिषदेत तशीच आहेत. आतापर्यंत आमच्याकडे ७५ सदस्यांपैकी ३० सदस्य आहेत. यावेळी आम्हाला आणखी आठ ते नऊ जागा मिळाल्या तर आम्ही बहुमत मिळवू. यातून ही विधेयके मंजूर होऊ शकतात, असे काँग्रेसच्या सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, काँग्रेसने शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघासाठी दोणाऱ्या सहा जागांसाठी आपल्या उमेदवारांची नावे आधीच जाहीर केली आहेत, तर भाजपने अद्याप उमेदवारांची घोषणा केलेली नाही. या निवडणुकीसाठी आज अधिसूचना जारी करण्यात आली. पक्षाने प्रत्येक मतदारसंघासाठी दोन-तीन नावांची शिफारस केली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र म्हणाले की, हायकमांड लवकरच उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्याची अपेक्षा आहे.

विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि तीन शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची अधिसूचना गुरुवारी प्रसिद्ध झाली. उमेदवारी प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. ईशान्य पदवीधर, दक्षिण-पश्चिम पदवीधर आणि बंगळूर पदवीधर मतदारसंघांसाठी आणि दक्षिण-पूर्व शिक्षक, दक्षिण-पश्चिम शिक्षक आणि दक्षिण शिक्षक मतदारसंघांसाठी निवडणुका होणार आहेत. यापैकी धजदने गेल्या वेळी दक्षिण शिक्षक मतदारसंघ आणि दक्षिण पश्चिम शिक्षक मतदारसंघ जिंकले होते. मरितीब्बेगौडा यांनी दक्षिण शिक्षक मतदारसंघाचे तर एस. एल. भोजेगौडा यांनी दक्षिण पश्चिम शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. यापैकी मरतिब्बे गौडा यांनी यापूर्वीच राजीनामा देऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

### विधान परिषदेतील बलाबल

■ एकुण जागा -------- ७५
■ काँग्रेस -------- ३०
■ भाजप-------- ३२
■ धजद -------- ७
■ अपक्ष-------- १
■ रिक्त-------- ५

### भाजप, धजद स्वतंत्र लढणार?

■ विधान परिषदेच्या सहा जागांची निवडणूक भाजप आणि धजदच्या युतीसाठी कसोटी ठरणार आहे. परिषद निवडणुकीतही दोन्ही पक्षांची युती कायम रहाणार की, दोन्ही पक्ष स्वतंत्र निवडणूक लढविणार हे अजून निश्चित झालेले नाही. धजद खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्या अश्लील व्हिडिओ प्रकरणाने दोन्ही पक्ष एकमेकाशी कसे जुळवून घेतात आणि परिषद निवडणुकीला कसे सामोरे जातात याकडे राज्याचे लक्ष आहे.



# Mumbai University colleges without development panel to face action

Mumbai | The Mumbai University on Thursday gave an ultimatum to all colleges to form College Development Committees (CDCs) within next eight days and start submitting reports, which ideally should have been done by all affiliated colleges before June. The decision was taken at a meeting of the Management Council of Mumbai University.

Out of 894 colleges affiliated to the Mumbai University, just 350 have formed CDCs, which is mandatory to prepare an overall comprehensive development plan of respective colleges. And, of those with CDCs, only 150 have submitted reports to the university.

The issue of absence of CDCs was highlighted during the Senate meeting held in March, where members raised concerns as CDCs are crucial to advise and prepare plans for academic, administrative and infrastructural growth of respective colleges.

The CDC comprises the college principal, representatives from management, teaching and non-teaching staff, students and external individuals from the field of education, industry, research and social service. It is mandatory under the Maharashtra Public Universities Act 2016 for all colleges to have CDC.

Apart from planning and executive growth of the colleges, these committees are also responsible to brainstorm and recommend new courses, updated safety and security measures among other tasks. The CDC is expected to meet at least four times in an academic year to submit an updated growth plan to Mumbai University every year in June.

The MU management council on Thursday decided that action will be taken against colleges as per the Maharashtra Public Universities Act 2016, if CDCs are not formed in all remaining colleges within next eight days.

"This is a serious lacuna which may be hampering the growth of individual institutions. Considering the academic flexibility recommended under the National Education Policy (NEP), it is required for colleges to keep updated to provide quality education to students," said an official from Mumbai University.

The Mumbai University may soon have borewell to tackle water shortage in its Kalina Campus. "Every time the varsity spends close to Rs 50,000 for tanker service. The annual budget of financial year 2024-'25 passed recently, has earmarked Rs 25crore for hostels and water sustainability. The action plan to tackle water shortage will include digging 5-6 borewells and water conservation projects on campus, apart from follow-up with civic authorities to get more water connections," said an official.

## Lokhandwala joggers park

# HC asks BMC to ensure no further construction, encroachment at park



Mumbai | The Bombay High Court on Thursday directed the Assistant Municipal Commissioner of K-West ward of the Brihanmumbai Municipal Corporation (BMC) to ensure that no further construction or encroachment comes up in the Chhatrapati Shivaji Maharaj Joggers Park at Lokhandwala in Andheri (West). It asked the BMC to 'take to the logical end' the notice issued by it on January 23, this year, seeking information from the organisations managing Gurudwara and an open kitchen.

The notice sought from the organisations, the details of permissions granted to them and plans approved by authorities as the allegations of encroachment and illegal construction at the Joggers Park were made against them. The BMC in its notice said that if no document or permission was submitted by the respondents, necessary action would be instituted. However, the petitioners claimed the civic body failed to take any action as yet.

The respondents Celebrations Sports Club which maintains the park and Punjabi Association of Lokhandwala stated before the court that they will ensure that no further construction or encroachment will be permitted in the Joggers Park.

A division bench of Justices N M Jamdar and M M Sathaye passed orders in PIL filed by Anuj Mittal and other residents of Lokhandwala area argued through advocate Subhash Jha raising concerns over alleged encroachments. A member of the Mangrove Protection and Conservation Monitoring Committee had also issued a notice raising a query into whether there is any damage to the mangroves or whether any construction is ongoing within 50 metres of the mangroves.

In light of this, the court said that the two respondents along with Sanjha Chulha Guru Ka Langar Trust will also ensure that there is no damage or disturbance to the mangroves as concern is expressed in that regard.

It noted that "as the respondents are organising religious functions where a large number of persons attend and food is served, it is equally their responsibility to maintain hygiene and not litter garbage in public places and in the park." "If such activities are taking place, then the BMC, on whom we have placed the responsibility, will ensure that necessary action is taken and all rules and regulations are followed by the respondents," the bench added.

# SC grants interim bail to Delhi CM Arvind Kejriwal till June 1 in excise policy case



New Delhi : The Supreme Court Friday granted interim bail until June 1 to Delhi Chief Minister Arvind Kejriwal, who was arrested on March 21 by the Enforcement Directorate in connection with the alleged excise policy scam.

Justice Sanjiv Khanna, presiding over a two-judge bench with Justice Dipankar Datta, said orally, "We are passing an order giving him interim release till June 1, 2024." The court added that it will upload its order.

The bench made it clear that Kejriwal will have to surrender on expiry of the interim bail term.

As soon as the bench took up the matter, Solicitor General Tushar Mehta, appearing for the ED, said, "Now we have been approached by Amritpal Singh. That's a concern." Singh, chief of the Waris Punjab De outfit, is currently lodged at Dibrugarh jail in Assam under the National Security Act.

Metha said he "could not find any precedent to assist Your Lordships either way, that a person is released for campaigning."

But Justice Khanna said, "Let's not put into a simple straightjacket like that."

He added that the case was registered in August 2022 and Kejriwal was arrested in March 2024 after about one and half years. "Twenty-one daysshould not make any difference," he said.

Senior Advocate A M Singhvi, appearing for Kejriwal, wondered if he can get more time and pointed out that the Lok Sabha results are on June 4.

But the court refused any further extension. "No no, we will try and conclude the arguments next week and try and pronounce the judgement if possible," the court observed.

Mehta insisted that Kejriwal should surrender at the expiry of interim bail. "He will surrender," said Justice Khanna.

Earlier this week, on Tuesday, the ED had opposed the suggestion for interim relief and urged the Bench not to carve out a separate class for politicians just because they want to campaign for elections.

"What example are we setting? He is a chief minister and wants to campaign, and therefore he (should be granted interim bail)?" Mehta had said, adding that "to release him on interim bail because he is a politician would send a very wrong message".

Justice Khanna had then said, "It is the election season. He is the elected chief minister of Delhi. The elections are around the corner. These are extraordinary situations. It's not normal He is not otherwise a habitual (offender) or somebody who has been involved in any other case."

थोडक्यात




## पालघरमधील सहाही आमदार आमच्यासोबत, हितेंद्र ठाकूर यांचा दावा

● पालघर, प्रतिनिधी :

पालघर लोकसभा मतदारसंघात यावेळी भाजपा, ठाकरे गट आणि बहुजन विकास आघाडी अशी तिरंगी लढत होत आहे. त्यात भाजपाने हेमंत सवरा, ठाकरे गटाने भारती कामडी आणि बविआने राजेश पाटील यांना उमेदवारी दिली आहे. तिन्ही पक्षांची येथे बऱ्यापैकी ताकद असल्याने अटीतटीची लढत होण्याची शक्यता आहे. दरम्यान, येथील बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर यांनी केलेल्या एका विधानामुळे भाजपा आणि ठाकरे गटाचं टेन्शन वाढण्याची शक्यता आहे. पालघर लोकसभा मतदारसंघातील सहाही आमदार आमच्यासोबत आहेत, असा दावा हितेंद्र ठाकूर यांनी केला आहे.

पालघर लोकसभा मतदारसंघातील वसई, विरार भागात हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीचा प्रभाव आहे. तसेच या मतदारसंघातील वसई, नालासोपारा आणि बोईसर या विधानसभा मतदारसंघात बविआचे आमदार आहेत. तर पालघरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे श्रीनिवास वनगा, विक्रमगडमध्ये शरद पवार गटाचे सुनील भुसारा आणि डहाणूमध्ये सीपीएमचे विनोद निकोले हे आमदार आहेत.

दरम्यान, शुक्रवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना हितेंद्र ठाकूर म्हणाले की, माझ्याविरोधात हे आमदार एकही शब्द बोलणार नाहीत. कारण त्यांना कुठल्याही कामात मदत करताना मी पक्षभेद करत नाही. मग डीपीसीची बैठक असो वा मंत्रालयातील कामं असोत, तीनही आमदारांबाबत मी कोणता पक्ष आहे हे पाहत नाही. हे तीन आमदार आमचे आणि तीन आमदार आमच्या जिल्ह्याचे आहेत. त्यामुळे सहाही आमदार आमचे आहे. तसेच ते येत्या लोकसभा निवडणुकीत ते आम्हाला एक हजार एक टक्के मदत करतील, अशी आम्हाला खात्री आहे.

## मताचं दान करा म्हणत वासुदेवांनी केले मतदानाचे अवाहन



पनवेल प्रतिनिधी : सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी पनवेल महापालिकेने अभिनव उपक्रम राबविला असून 'मताचं दान करा' म्हणत चारही प्रभागामध्ये वासुदेव मतदान जनजागृती करत आहेत.

येत्या 13 मे रोजी मावळ लोकसभा मतदारसंघामधील पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये मतदान होणार आहेत. यामध्ये नागरिकांच्या मतदानाचा टक्का वाढावा यासाठी पनवेल महापालिकेच्यावतीने विविध अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदान जनजागृती केली जात आहे.

## जरांगे पाटील आरक्षणाचे हिरो; त्यांच्या त्याग, बलिदान, कष्ट याविषयी मला आदर'- पंकजा मुंडें

● बीड, प्रतिनिधी :




मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मोठा लढा उभारला आहे. त्यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारनं मराठा समाजाला स्वतंत्र्य आरक्षण मंजूर केलं. मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या मागणीवर जरांगे पाटील अजूनही ठाम आहेत. दुसरीकडे भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे. मराठा आरक्षणाचे हिरो जरांगे पाटील आहेत. त्यांच्या कार्यक्रमाला, आंदोलनाला जा पोस्ट करा त्याला कोन नाही म्हणाले. जरांगे पाटील यांचे त्याग बलिदान कष्ट याविषयी आदर आहे. असं वक्तव्य भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी केलं आहे. त्या बीडच्या नेकनूर येथे आयोजित जाहीर सभेत बोलत होत्या. पहिल्यांदा मराठा समाजाला भाजपनं आरक्षण दिलं असंही त्या यावेळी म्हणाल्या.

दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणावरून पुन्हा एकदा राज्य सरकारला इशारा दिला आहे. जर जूनपर्यंत मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटला नाही तर आपण विधानसभेच्या सर्व 288 जागांवर उमेदवार उभे करणार आहोत असं त्यांनी म्हटलं आहे. तसेच उपोषणाचा देखील इशारा देण्यात आला आहे. यावेळी पाडणारे बना, आपल्या मुला बाळाचा चेहरा समोर ठेवून मतदान करा, पुढच्या वेळेस आरक्षण देणारे बनवू असं आवाहनही अनेकदा जरांगे पाटील यांनी केलं आहे.

## दहावी-बारावी निकालाआधी महत्त्वाची बातमी, बोर्डाकडून परीक्षा शुल्कात वाढ

● पुणे, प्रतिनिधी :

दहावी बारावीचा निकाल लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. मे महिन्यातच लागणार असल्याची चर्चा आहे. अद्याप महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. दरम्यान, निकालाआधी बोर्डाने मोठा निर्णय घेतला आहे. महागाईची झळ बोर्डालाही बसत असून परीक्षा शुल्कात वाढ करण्यात आली आहे.



माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२४ आणि मुख्य परीक्षा - २०२५ साठी सुधारीत शुल्क आकारले जाणार आहे. तर दहावीच्या नियमित आणि पुनर्परीक्षार्थींसाठी ४२० रुपयांवरून ४७० रुपये तर खासगी विद्यार्थ्यांसाठी अर्ज आणि नोंदणी शुल्क १ हजार ३४० रुपये इतके असणार आहे. छपाई आणि स्टेशनरी दरात वाढ झाली आहे. त्यामुळेच परीक्षा फी वाढवण्याबाबत निर्णय घेण्यात आल्याचं बोर्डाने म्हटलं आहे.

यासंदर्भात राज्य मंडळाच्या बैठकीत अनेकदा चर्चा झाली होती अशी माहिती बोर्डाकडून देण्यात आलीय. सुधारीत परीक्षा शुल्कासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

नियमित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क ४७० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका लॅमिनेशन २० रुपये, प्रमाणपत्र २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क १० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र विषय) १०० रुपये असं असणार आहे. तर खासगी विद्यार्थ्यांना नाव नोंदणी अर्ज आणि नोंदणी शुल्क मिळून १ हजार ३४० रुपये शुल्क द्यावे लागणार आहे. याशिवाय श्रेणीसुधार परीक्षार्थींना ८४० रुपयांऐवजी ९३० रुपये शुल्क द्यावे लागेल.

## विलीनीकरण नव्हे, एकत्र काम करणार! शरद पवारांनी दिला चर्चेला पूर्णविराम



● सातारा प्रतिनिधी :

राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस हे दोन्ही पक्ष २००१ पासून सोबत काम करत आहेत. दोन्ही पक्षांची विचारधारा एक आहे. आम्ही लोकसभेच्या निवडणुकाही एकत्रित लढविल्या आहेत. दोन्ही पक्षांनी एकत्र काम करणे गरजेचे असून, यापुढेही आम्ही एकत्र काम करणार आहोत. त्यामुळे विलीनीकरणाचा प्रश्नच येत नाही, असे सांगत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी काँग्रेसमधील विलीनीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. भाजपसोबत जाण्याचा निर्णय पवार साहेबांनी घेतला होता, असे अजित पवार म्हणाले होते. माध्यमांनी या प्रश्नाबाबत छेडले असता शरद पवार म्हणाले, आमचा कोणताही निर्णय भाजपसोबत जाण्याचा नव्हता. आमची व भाजपची विचारधारा वेगळी आहे. आमच्यातील काही सहकारी भाजपमध्ये जाण्याच्या विचाराचे होते. मात्र, तो काही पक्षाचा निर्णय नव्हता.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त शरद पवार गुरुवारी साताऱ्यात आले होते. मागील लोकसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी आणि एमआयएम या तीन पक्षांचे मिळून सहा खासदार निवडून आले. यंदा परिस्थिती वेगळी आहे. इंडिया आघाडीला महाराष्ट्रात प्रचंड समर्थन मिळत आहे. महाराष्ट्रातून इंडिया आघाडीचे ३० ते ३५ खासदार निवडून येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान पदाचा उमेदवार अजून निश्चित झाला नसल्याच्या टीकेवर, भाजपच्याच पक्षाचे मोरारजी देसाई हे पंतप्रधान झाले तेव्हा पंतप्रधान पदाचा उमेदवार कुठे ठरला होता? असा सवाल केला.

## डोंगर बचाव दलाने २०० फूट दरीत कोसळलेल्या इतिहास अभ्यासकाचा जीव वाचवला

● ठाणे प्रतिनिधी :

माहुली गडावर अभ्यासाकरिता आलेला कपिल कसबे (३७) हा तरुण बुधवारी रात्रीच्या वेळी गडावरून चालत असताना अचानक पाय घसरून मुख्यवाटे पासून सुमारे २०० ते ३०० फूट खोल दरीत कोसळला. ही माहिती मिळताच शहापुरातील जीवन रक्षक टीमने त्याचा मागोवा काढण्याचा प्रयत्न केला. तो माहुली गड परिसरातील खोर गावाच्या जवळपासच्या दुर्गम भागात अडकला असल्याचे निश्चित झाले. गुरूवार पहाटेपासून रेस्क्यू ऑपरेशन मोहिम सुरू केल्यानंतर सकाळी ९.३० च्या सुमारास कपिल यास जखमी अवस्थेत अँब्युलन्सपर्यंत आणण्यात सर्वांना यश आले. कपिल हा कलाकार असून माहुली गडावरील शिल्प आणि इतर ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास करण्यासाठी आला होता. गडावरील कल्याण दरवाजाकडून भटोबा सुळक्याकडे जातांना कपिल भरकटला होता.



■ नांदेडचा कपिल कसबे हा माहुली किल्ल्यावरील शिल्प आणि इतर ऐतिहासिक गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी काही दिवसांपासून किल्ल्यावर होता. एके ठिकाण अवघड कड्यावरून त्याचा तोल गेला आणि तो दोनशे ते तिनशे फुटांवरून खाली कोसळला, यात त्याला जबर जखमा झाल्या. स्थानिक बचाव दलाच्या कार्यकर्त्यांनी माहिती मिळताच त्याचा शोध घेतला. माहुली गावातील दिगंबर आगीवले आणि खोर येथील दशरथ भगत हे सर्वात पहिले त्या व्यक्ती जवळ पोहोचले.

■ भूषण विशे आणि तन्मय निमसे हे साहित्य घेऊन अपघाताच्या ठिकाणी पोहचले. पण मनुष्यबळ कमी पडत होते. रात्रीच्या अंधारात बचाव मोहिम पुरेशा मनुष्यबळाअभावी राबविणे शक्य नव्हते. जीवरक्षक शहापूर टीमचे अमित तावडे अशोक रागडे आणि अक्षय शहाणे गवळी अशी आणखी कुमक सामिल झाली. प्रशासनाकडून हेलिकॉप्टरची मदत मिळू शकेल का याचा आढावा घेण्यात आला. अखेर महाराष्ट्र डोंगर बचाव दलाचे डॉ. सुमित मांदळे हे अपघातग्रस्तासोबत बोलले आणि त्याच्या जखमांची माहिती घेतली.

## प्रशासन अधिकारी निवडणूक कामात; भूमाफियांकडून अनधिकृत बांधकामे जोमात

● उल्हासनगर प्रतिनिधी :



अंबरनाथ, उल्हासनगर पालिकांतील सर्वच विभागांतील अधिकारी गेल्या महिनाभरापासून लोकसभा निवडणुकीच्या कामांमध्ये व्यस्त आहेत. यापैकी अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांवर विविध जबाबदाऱ्या सोपवल्या आहेत. नेमक्या याचाच फायदा घेत भूमाफीयांकडून अवैध बांधकामे जोरात सुरू झाली आहेत. शहर आणि ग्रामीण भागांत बेकायदा इमारतींचे मजल्यांवर मजले चढवले जात आहेत.

मागील एक ते दीड महिन्यांपासून लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता तसेच मतदान केंद्रे उभारणे, कायदा-सुव्यवस्था सांभाळण्यासाठी प्रशासनातील महापालिका, तहसील कार्यालय, पोलिस आदी सर्वच शासकीय विभागाचे कर्मचारी निवडणूक कामात गुंतलेले आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयांमधील दैनंदिन कामकाजांवरही त्याचा परिणाम होत आहे. तसेच या अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीचा फायदा भूमाफीया आणि अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून घेतला जात आहे.

उल्हासनगरमधील अनेक भागांत बेकायदा अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. हीच परिस्थिती अंबरनाथ शहरातील पूर्व आणि पश्चिम भागांतील काही परिसर तसेच तालुक्यातील ग्रामीण भागांतही दिसत आहे. प्रशासन निवडणुकीच्या कामांमध्ये व्यस्त असताना किमान स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनधिकृत बांधकामांना अटकाव करण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधींकडूनही या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना पाठीशी घातले जात आहे. त्यामुळे सर्वत्र अनधिकृत बांधकामे होत असल्याने शहराचे विद्रुपीकरण सुरू आहे.

## अवकाळी पावसामुळे प्रचारसभांवर पाणी फेरले, उद्धव ठाकरेंची जालन्यातील सभा रद्द

● जालना, प्रतिनिधी :

हवामान विभागाकडून राज्यामध्ये मुंबई आणि कोकण विभाग सोडून 29 जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. लोकसभेच्या चौथ्या टप्प्यासाठी राज्यांमध्ये झंझावाती प्रचार सुरू आहे. त्यामुळे राज्यभर महाविकास आघाडीसह महायुतीमधील नेत्यांच्या सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. मात्र पावसाने या सभांवर पाणी फेरलं आहे. अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे सभा रद्द करण्यात आल्या आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा जालना दौरा रद्द करण्यात आला आहे. आता ते सायंकाळी छत्रपती संभाजी नगरकडे प्रयाण करणार आहेत. मात्र, छत्रपती संभाजी नगरची सभा सुद्धा खराब हवामानामुळे होते की नाही? याकडे सुद्धा लक्ष लागून राहिलं आहे. उद्धव ठाकरे यांची जालन्यामध्ये कल्याणराव काळे यांच्या प्रचारार्थ सभा आयोजित करण्यात आली होती. मात्र, अवकाळी पावसामुळे सभा रद्द करण्यात आली आहे.

अजित पवार यांची सभा नगरमधील पारनेरमध्ये होती. यावेळी पावसामध्ये अजित



पवार यांची सभा सुरू झाली. त्यामुळे एकंदरीत राज्यातील अनेक सभांवर पाणी फेरलं गेलं आहे. राज्यात पुढील पाच दिवस 29 जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे त्याचा परिणाम मतदानावर देखील होतो का? याची चर्चा आहे. पहिल्या तीन टप्प्यांमध्ये रणरणत्या उन्हाचा मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम झाला. मात्र, आता चौथ्या टप्प्यांमध्ये उन्हाची चिंता नसली, तरी अवकाळी पावसाची मात्र टांगती तलवार असणार आहे

पुण्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्यानंतर विमाननगर परिसरात एक झाड थेट वाहनावर कोसळलं. त्या वाहनामागून भोसरीतील भाजपचे आमदार महेश लांडगे येत होते. त्यांच्या समोरच्या वाहनावर झाड कोसळल्याचं पाहून लांडगे त्यांच्या मदतीला धावले.

## मध्यप्रदेशातून बाळाचं अपहरण

### कल्याणमधून ६ अटकेत, अपहरणाची कहाणी ऐकून पोलिसही चक्रावले

● कल्याण प्रतिनिधी :

मध्यप्रदेशहून अपहरण झालेल्या सहा महिन्यांच्या बाळाची कल्याण खडकपाडा पोलिसांनी मध्यप्रदेश पोलिसांच्या मदतीने अवघ्या आठ तासात सुटका केली आहे. या प्रकरणात कल्याण पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. यामध्ये लिलावती रुग्णालयात काम करणारा अटेंडंट, त्याची पत्नी, एक रिक्षा चालक आण रिक्षा चालकाच्या शेजारी राहणारे फेरीवाला दांम्पत्य आणि शिक्षक अशा ६ जणांना अटक केली आहे. मात्र या अपहरणात अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. कोल्हापूरमधील एका शिक्षकाला लहान बाळ हवं होतं. या शिक्षकाने २९ लाख रुपये खर्च केले. दरम्यान खडकपाडा पोलिसांनी या सहा महिन्याच्या बाळाला मध्यप्रदेश पोलिसांच्या स्वाधीन केलं, तर या सहा आरोपींना देखील मध्यप्रदेश पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे. उघडकीस आलेल्या अपहरणामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.



मध्यप्रदेश येथील रिवा जिल्ह्यातील सीव्हल लाईन परिसरात रस्त्यावर झोपलेल्या फेरीवाला दाम्पत्याच्या सहा महिन्याच्या बाळाचं अपहरण झालं होतं .हे फेरीवाला दाम्पत्य फुटपाथवर झोपलं असताना दोन बाईकस्वारांनी सहा महिन्याच्या बाळाला जबदरस्तीने उलचून पळ काढला. बाळाच्या रडण्याचा आवाज आल्याने ते दाम्पत्य उठलं आणि त्यांनी दुचाकीचा पाठलाग केला मात्र, हे दुचाकीस्वार पसार झाले. या प्रकरणाची तक्रार सीव्हील लाईन पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. पोलिसांनी त्वरीत सीसीटीव्हीच्या सहाय्याने बाळाचं अपहरण करणाऱ्यांना ताब्यात घेतलं. तपसादरम्यान सहा महिन्याचं बाळ महाराष्ट्रात नेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस तपासादरम्यान अपहरणकर्त्यांनी नितीन सोनी आणि स्वाती सोनी उर्फ मेहक खान या दांम्पत्याचं नाव सांगितलं.

■ सोनी दांम्पत्य कल्याणला राहतात, अशी महिती मध्यप्रदेश पोलिसांना मिळाली. त्यांनी त्वरीत कल्याण पोलिसांशी संपर्क साधला. कल्याण खडकपाडा पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखत बाळाचा शोध सुरू केला. मध्यप्रदेश पोलिस देखील कल्याणला पोहचले.

■ डीसीपी सचिन गुंजाळ, एसीपी कल्याणजी घेटे आणि खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अमरनाथ वाघमोडे यांनी सहा महिन्याच्या बाळाच्या सुटकेसाठी सहा पथकं तयार केली. पोलीस अधिकारी शिवले, अनिल गायकवाड, ठोके, पोलीस कर्मचारी बुधकर यांच्या पथकाने नितीन आणि स्वाती सोनी या दोघांना ताब्यात घेतलं.

## एन्काउंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांना सुप्रीम कोर्टाकडून दिलासा; मुंबई पोलिसांकडे सरेंडर होण्याची अट रद्द

● मुंबई, प्रतिनिधी :

प्रसिद्ध एन्काउंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांना सुप्रीम कोर्टाने सर्वात मोठा दिलासा दिला आहे. प्रदीप शर्मा यांना मुंबई हायकोर्टाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. दोन महिन्यांपूर्वी 19 मार्चला प्रदीप शर्मा यांना मुंबई हायकोर्टाकडून जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आल्याची माहिती समोर आली होती. मुंबई हायकोर्टाच्या या निकालाविरोधात प्रदीप शर्मा यांनी सुप्रीम कोर्टात दाद मागितली होती. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी पार पडली. सुप्रीम कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर प्रदीप शर्मा यांना कायम जामीन मंजूर केला आहे. विशेष म्हणजे सुप्रीम कोर्टाने मुंबई हायकोर्टाने दिलेल्या आदेशावर आश्चर्य व्यक्त केलं आहे.

प्रदीप शर्मा यांच्या जामीन आणि स्थगिती मागणीवर सुप्रीम कोर्टात



सुनावणी पार पडली. प्रदीप शर्मा यांना मुंबई पोलिसांकडे सरेंडर होण्याची अट सुप्रीम कोर्टाने रद्द केली आहे. सुप्रीम कोर्टाच्या डबल बेंचने याबाबतचे आदेश दिले आहेत. सात दिवसात जामीन प्रक्रिया पूर्ण करा, असे आदेश सुप्रीम कोर्टाने मुंबई सत्र न्यायालयाला दिले आहेत. न्यायमूर्ती ऋषिकेश रॉय, न्यायमूर्ती प्रशांत मिश्रा यांच्या द्विसदस्य खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदिप शर्मा यांना

### नेमकं प्रकरण काय?

■ प्रदीप शर्मा यांनी त्यांच्या 13 पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह 11 नोव्हेंबर 2006 ला अंधेरीतील सात बंगला येथे फेक चकमक घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला होता. या चकमकीत त्यांनी लखनभैयाची हत्या केली होती. तसेच लखनभैयाची एन्काउंटरमध्ये हत्या झाल्याचा बनाव रचला होता, असा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी लखनभैयाचे वकील रामप्रसाद गुप्ता यांनी कोर्टात धाव घेतली होती. त्यांनी सातत्याने कोर्टात युक्तिवाद केला. कोर्टाने या प्रकरणी एसआयटी स्थापन करत चौकशीचे आदेश दिले होते. या प्रकरणी प्रदीप शर्मा यांना 2008 मध्ये निलंबित करण्यात आलं होतं. पण पुढे कोर्टाने त्यांची निर्दोष मुक्तता केल्यानंतर त्यांचं निलंबन मागे घेण्यात आलं होतं.

■ मुंबई सेशन कोर्टाने या प्रकरणी 2013 मध्ये 11 पोलीस आणि 21 जणांना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. यावेळी प्रदीप शर्मा यांना निर्दोष ठरवण्यात आलं होतं. या निकालाविरोधात वकील रामप्रसाद गुप्ता यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती. तसेच इतर 11 आरोपींनी जन्मठेपेच्या शिक्षाविरोधात मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती. मुंबई हायकोर्टात या प्रकरणांची एकत्रित सुनावणी पार पडली होती. मुंबई हायकोर्टाने प्रदीप शर्मा यांना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. प्रदीप शर्मा यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. तसेच इतर आरोपींनाही जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती.

लखनभैय्या हत्या प्रकरणात सेशन कोर्टानं निर्दोश मुक्तता केली होती. मात्र, उच्च न्यायालयाने हा निकाल फिरवून प्रदीप शर्मा यांना दोषी ठरवलं होतं.

## अरे कुणी घर देतं का घर? पुनर्वसन केंद्र सोडण्याच्या आदेशाने १८ ज्येष्ठ निराधार

● नाशिक प्रतिनिधी :

उतारवयात मुलं आपण केलेल्या त्यागाची जाणीव ठेवतील अन् म्हातारपण सुकर होईल या भाबड्या आशेवर त्यांनी उमेदीचा काळ संघर्षात घालवला. मात्र, मुले मोठी झाली आणि जन्मदात्यांचे उपकार विसरून गेली. निराधार झालेल्या वृद्धांना अखेर माणुसकी बेघर निवारा व पुनर्वसन केंद्राचा आधार मिळाला. मात्र, आता तोही आधार गमावण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. निवडणुकीमुळे हे निवारा केंद्र सोडण्याचे आदेश दिल्याने १८ ज्येष्ठ नागरिकांवर पुन्हा निराधार होण्याची वेळ ओढवली आहे.

अनाथ, बेघर, रस्त्यावर राहणारे, घरातून हाकलून दिलेल्या ज्येष्ठ नागरिकांना गेल्या बारा वर्षांपासून उदय बहुउद्देशीय सामाजिक शैक्षणिक संस्था संचलित माणुसकी बेघर निवारा व पुनर्वसन केंद्रामार्फत मदत मिळत आहे. या वृद्धांना मोफत अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्यासह इतर मूलभूत गरजा संस्थेतर्फे दिल्या जातात. संस्थेचे कार्य बघून नाशिक महापालिकेने गेल्या वर्षी एका वर्षासाठी निवारा केंद्र म्हणून गोदाकाठावरील महापालिका शाळा क्रमांक १६ मध्ये काम करण्याची मंजुरी दिली. गेल्या वर्षभरात जवळपास दीडशे वृद्धांना शोधून त्यांच्या मूलभूत गरजांसह मानसिक आधारही संस्थेने दिला.



मध्यंतरी महापालिका आयुक्तांनी संस्थेला भेट दिली. संस्थेचे काम पाहून पुढील पाच वर्षे त्याच जागी काम करण्याची तोंडी परवानगीही दिली. मात्र, निवडणुकीचा बिगुल वाजला आणि शाळेत मतदानासाठी बूथ करायचा असल्याचे सांगत महापालिका प्रशासनाने दोन दिवसांतच संस्थेला जागा सोडण्याचे आदेश दिले. त्यामुळे अगोदर निराधार असलेल्या ज्येष्ठांना आता पुन्हा निवाऱ्यासाठी शोधाशोध करावी लागत आहे. अधिकाऱ्यांच्या अरेरावीमुळे काही ज्येष्ठ नागरिक संस्थेतून बाहेर पडल्याचेही सांगितले जात आहे.

महापालिका प्रशासनाकडून अचानक मिळालेल्या नोटिशीमुळे संस्थाचालकांसह प्रत्येकाची चिंता वाढली आहे. अशातच 'कुणी घर देतं का?' म्हणत सोशल मीडियाच्या माध्यमातून नाशिककरांना आवाहनदेखील केले आहे.